# प्रकरण पहिले

# साठोत्तरी मराठी साहित्यविश्व

## प्रकरण पहिले
## साठोत्तरी मराठी साहित्यविश्व

आधुनिक मराठी साहित्यामध्ये विविध कालखंड पडतात. ते म्हणजे १८०० ते १८७४, १८७४ ते १९२०, १९२० ते १९६० आणि १९६० ते आजपर्यंत असे कालखंड पडले जातात.

वरील कालखंडापैकी १९६० नंतरच्या कालखंडात वि. शं. पारगावकर यांचे साहित्य मोडते. श्री. पारगांवकरांनी प्रामुख्याने कथा व कादंबरी या वाङ्मयप्रकारात लेखन केलेले आहे. साठोत्तरी वाङ्मयविश्व कसे होते, त्यात मुख्य वाङ्मयीन प्रवाह कोणते होते, विविध वाङ्मयप्रकारात ठळक असे कोणते लेखन झाले याचा धावता आढावा प्रस्तुत प्रकरणात घेण्याचे योजिले आहे. पारगांवकरांचे लेखन समजून घेण्यास याचा खचितच उपयोग होणार आहे.

या कालखंडात नवसाहित्योत्तर साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य, जन साहित्य हे प्रमुख वाङ्मयीन प्रवाह येतात. त्यांचा प्रथम विचार करुन त्यानंतर कथा, कादंबरी आदी वाङ्मयप्रकारांचा विचार करावयाचा आहे.

### नवसाहित्योत्तर साहित्य :-

मर्ढेकर - गाडगीळांनी कविता- कथाद्वारा नवसाहित्याचा प्रवाह जोरकसपणे मराठी साहित्यात आणला. मर्ढेकरांनंतर विंदा करंदीकर, य.द. भावे, इत्यादींनी हा

प्रवाह पुढे नेला. कथेबाबत अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर, शांताराम, दि. बा. मोकाशी आदींनी हा प्रवाह पुढे नेला.

१९६० नंतर या नवसाहित्याच्या प्रवाहाची पुढे वाटचाल होताना दिसते. कवितेबाबत दिलीप चित्रे, अरुण कोल्हटकर, भालचंद्र नेमाडे, गुरुनाथ धुरी आदी कवी जसे आपल्या समोर येतात त्याचप्रमाणे कथेबाबत जी. ए. कुलकर्णी, कमल देसाई, दिलीप चित्रे, शरच्चंद्र चिरमुले, गौरी देशपांडे, सानिया आदी कथाकारही समोर येतात. हा प्रवाह आजही श्याम मनोहर, रंगनाथ पठारे यासारख्या कथाकारांनी तसेच अनुराधा पाटील, नीरजा, नारायण कुलकर्णी, कवठेकर आदी कवींद्वारा पुढे वाटचाल करतो आहे.

स्थूलमानाने या साहित्याची, मानवी जीवनावर नियतीचा असणारा प्रभाव, समाजाचे सूक्ष्म निरीक्षण, वास्तववाद, अस्तित्ववाद या तत्वप्रणालींचे कलात्मक उपयोजन, प्रायोगिकता, संमिश्र भावानुभावाचे प्रत्ययकारी चित्रण, आशयानुरूप भाषाशैलीची योजना इत्यादी वैशिष्ट्ये मांडता येतील.

दलित साहित्य हे प्रयोजन असलेले साहित्य आहे. यामध्ये सामाजिक जाणिवा व्यक्त करणे, वाचक, श्रोता, यांच्या मनावर विशिष्ट परिणाम घडवून आणणे, स्वकीयांना क्रांतीसाठी उद्युक्त करणे, त्यांच्या मनामध्ये अन्यायाविरुध्द लढण्याची वृत्ती निर्माण करणे, आपले प्रश्न आपणच सोडविले पाहिजेत याची जाणीव करून देणे अशी विविध प्रयोजने या साहित्यनिर्मितीच्या मुळाशी असलेली दिसून येतात.

स्वतंत्रतेचा पहिला अनुभव दलितांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर आला. स्वतः बाबासाहेब धर्मांतरानंतर म्हणाले, " विषमता, जुलूमशाहीवर आधारलेल्या, जुन्यापुराण्या धर्माचा त्याग करुन आता माझा पुनर्जन्म झालेला आहे. मला आता नरकातून सुटल्यासारखे वाटते." [१] दलित साहित्यातील दुःख हे केवळ एका वर्गाचे नाही, तर हे दुःख अनेक वर्गातील लोकांचे आहे, असे स्वतः बाबासाहेबांनीच म्हटले आहे. त्यासाठी त्यांनी आयुष्यभर कष्ट घेतले. त्यांना स्वतःच्या जाणिवांची ओळख करुन देणारे ते एकमेव समाजसेवक आहेत. दलित आणि दलितेतर हे एकाच समाजाचे जरी घटक असले तरी त्यांचे विश्व मूलतः भिन्नच आहे. डॉ. बाबासाहेबांनी १९५६ साली हे गृहीत धरूनच धर्मांतराचे पाऊल उचलले. दलितेतरांच्या वैचारिक गुलामगिरीवर हा प्रत्यक्ष प्रहार होता. पण लवकरच डॉ. बाबासाहेबांचे महानिर्वाण झाल्याने दलित समाजावरही मोठा आघात झाला. आणि यातून दलित साहित्य उभे राहिले. बाबासाहेबांच्यामुळे दलित माणसाला योग्य न्याय व त्यांचे हक्क मिळाले. ते आपल्या वक्तव्यात म्हणतात, " आपली सुखदुःखे आपल्या भाषेत बोलणारे लेखन झाले पाहिजे ." [२] ते असेही म्हणतात, कोणत्याही ग्रंथाची भाषा जिवंत व नारळातील पाण्याइतकी मधुर हवी. ग्रंथाची भाषा विचारशील हवी. तसेच समाज परिवर्तन करणारी हवी या सर्वातून प्रत्येकाची विचार शक्ती जागृत झाली पाहिले. तरच ती साहित्यकृती यशस्वी ठरेल.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पाऊलावर पाऊल ठेवणारे दलित लेखक म्हणजे किसन फागू बनसोडे. यांनी साहित्याच्या माध्यमातून दलितवर्गाबद्दल आपली भूमिका स्पष्ट केली आहे. ते म्हणतात, " भक्तीच्या मुलाम्याने माणुसकीला किंमत येते असे नाही. "[३] हे सूत्र प्रत्येकाने स्मरणात ठेवून साहित्यकृती लिहिली पाहिजे. त्यांच्या एकूण साहित्याने पारंपरिक निकष नाकारले.

त्याचबरोबर दलित साहित्यामध्ये आणखी काही लेखकांचा सिंहाचा वाटा आहे. यामध्ये नामदेव व्हटकर, चा. भ. खैरमोडे, शंकरराव खुराडकर, ना. रा. शेंडे, हरिहरराव सोनुले, दा. ता. रूपवते, घनश्याम तळवटकर, इत्यादी दलित लेखकांनी साहित्याच्या माध्यमातून आपले विचार सर्वत्र रूजविले.

दलित साहित्याची वास्तव भूमिका योग्य प्रकारे आपल्या साहित्यातून रेखाटणारे प्रमुख लेखक म्हणजे शंकरराव खरात, बंधुमाधव, बाबुराव बागूल, नामदेव ढसाळ, ज. वि. पवार, राजा ढाले, वामन होवाळ, केशवराव मेश्राम, दया पवार, अर्जुन डांगळे, अरुण कांबळे, माधव कोंडविलकर, भालचंद्र फडके हे होत. तर रा. ग. जाधव, गो. म. कुलकर्णी, बाळकृष्ण कवठेकर, प्रभाकर मांडे, यशवंत मनोहर, इत्यादी लेखकांनी १९६० नंतरच्या काळात समीक्षेत मोठीच भर घातलेली दिसून येते. तसेच या दलितसाहित्याच्या भविष्याची विवेचक चर्चाही त्यांनी केली आहे.

बाबुराव बागूल यांच्या मते, " केवळ समाज सुधारण्याने अस्पृश्यता जात नाही. तर अस्पृश्यता घालवायची असेल तर केवळ समाज बदलून चालणार नाही.

त्यासाठी राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. "[४] अशा सम्यक क्रांतीसाठी दलित साहित्य विद्रोहाची भूमिका घेते.

विद्रोहाच्या संकल्पनेच्या मागे पीडक व पीडित यांचे व्दंद्व असते. या व्दंव्दाचा अर्थ, ते पीडक आणि पीडित या दोघांना अंतिम विश्लेषणात परस्पर-पोषक ठरते. त्याचप्रमाणे विद्रोह संकल्पनेतील पीडक - पीडित व्दंव्द उभयताना फलदायी ठरते.

सामान्यतः पीडितांचा म्हणजे समाजातील बहुसंख्याकांचा वर्ग होय. त्यामुळे विद्रोह करणारा वर्ग हा पीडितांचाच असतो. या पीडितांचे अनेक प्रकार आहेत. उदा. वांशिक, धार्मिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय इत्यादी स्वरूपाचे अत्याचार पीडितांचा वर्ग सहन करीत असतो. अनेकदा त्या अत्याचारांना परंपरागत आचार विचारांचे पाठबळही लाभते. पीडितांनाही परंपरेचे दास्य झुगारून देता येत नाही. विद्रोहाच्या एकूण चळवळीला पीडित वर्गाचा लाभणारा प्रतिसाद व्यक्तिपरत्वे कमी - अधिक स्वरूपात तीव्र असू शकतो.

बाबूराव बागूल यांच्या लेखनातून उद्दाम व झंझावाती भाषेचा आणि विचार-प्रवण करणाऱ्या विद्रोहाचा लाव्हा अनेकदा आढळतो. त्यांचे एकूण साहित्य विद्रोह-प्रणित असते. ' जेव्हा मी जात चोरली होती.(१९६२), ' मरण स्वस्त होत आहे.' (१९६९), 'सूड ' (१९७०) अशा अनेक कलाकृतीतून बाबुराव बागुलांचे आत्मवेध घेणारे व समाजचिंतनात सतत बुडालेले मन प्रकर्षाने ध्यानात भरते.

बाबुराव बागूल यांच्यानंतर नामदेव ढसाळ यांनी दलित साहित्यात एक नवे ' नामदेव पर्व ' सुरु केले. आणि हे पर्व साहित्याच्या माध्यमातून सुरु केले. त्यांचे साहित्य 'गोलपिठा ' (१९७२), 'मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले ' (१९७५), ' तूही यत्ता कंची ' (१९८१), या तीन संग्रहातून दलितांची दुःखे त्यांनी सांगितली आहेत. त्यांची ' हाडकी हाडवळा ' ही कादंबरी महत्वाची आहे. १९६० नंतरच्या साहित्यात त्यांचे यशवान श्रेष्ठ दर्जाचे आहे. नामदेव ढसाळ यांची कविता अंतर्बाह्य निराळी आहे. त्यातून दलितांच्या वेदना स्पष्ट होतात.

दया पवार यांनी 'बलुतं ' मध्ये अस्पृश्यांच्या जीवनाचे चित्रण केले आहे. स्वतः अनुभव घेतल्यामुळे त्यांच्या विदारक जीवनाचे सत्य दर्शन 'बलुतं ' मध्ये घडते. त्यांच्या अनेक कवितांतून अस्पृश्यांची लोकांची दुःखे येतात. ' कोंडवाडा ' या कवितासंग्रहात त्यांचे जिवंत अनुभवविश्व समाविष्ट झाले आहे. त्यांच्या अनेक कवितांमध्ये त्यांनी भोगलेले जीवन स्पष्ट केले आहे. ' माझे शब्द ' मध्ये ते म्हणतात, या देशातील जातीजातींची मडक्यांची उतरंड नुसती श्रमाची विभागणी नाही, तर श्रमिकांची विभागणी आहे. एक जात नेमकी दुसऱ्या जातीच्या तोंडावर बसलेली, त्यामुळे गुदमरलेली अवस्था, आपण तर अगदी तळचं मडकं - त्यातही रोडकीचं रोड-प्यार, पाणलोटाने कचरा किनाऱ्याला लोटावा तसं आपलं आयुष्य, वडिलांचा लावण्याचा छंद, रायरंद या भटक्या जमातीची गाणी, जलसाकाराची जागृती, अण्णाभाऊंची गाणी ऐकून एक नवा शोध लागतो. शब्द हे क्रांतीकारक असू

शकतात. शब्दांनी सत्ताही डळमळते याच अनुभवामुळे प्रौढपणी एक वेगळी दृष्टी आली.

राजा ढाले म्हणतात, पवारांची कविता वैयक्तिक आशयापेक्षा सामाजिक आशयाने भरलेली कविता आहे. ही कविता व्यक्तीची नसून समाजाची आहे. ती एकसुरी नसून तिला समाजाच्या दुःखाचे अनेक सूर आहेत. ते पुढे म्हणतात पवारांची कविता अस्सल जीवन रेखाटते.

मेश्राम यांच्या कवितेत वेदना व विद्रोह यांचा स्वर आहे. पण त्याहीपेक्षा त्यांच्या कवितेत स्वतःला शोधण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. नव्या जाग्या झालेल्या समाजाला आपण कोण, आपले अस्तित्व कशासाठी इत्यादी प्रश्न पडतात. या सर्व प्रश्नांनी त्यांचे मन बेचैन होते. आणि नंतर ते दुःखी होतात. दलित वर्गाबद्दल कवीच्या भावना स्वच्छ आहेत. त्यांची एकूण तळमळ ही दलितवर्गासाठीच दिसते. मेश्राम उच्चभ्रू समाजात वावरत असल्यामुळे त्यांना दोन्ही समाजाच्या नाडया माहीत आहेत. तसा दलित समाज गावकुसाबाहेर आपले जीवन जगत आहे. स्वतःची अस्मिता जागी झालेला वर्ग गावकुसाच्या आत आपली स्वतःची अशी जागा शोधतो आहे. कवी मेश्राम यांचे संवेदनाक्षम मन त्याला मूर्त रूप देत राहते. प्राध्यापिका शांता शेळके म्हणतात - सामाजिक स्तरांतून कवीचा जो आजवरचा प्रवास झाला आहे त्या स्तरांचे निर्भीड आणि डोळस चित्रण 'उत्खनन' मध्ये आहे.

कवी मेश्राम यांच्या नंतरचे महत्वाचे कवी ज. वि. पवार हे देखील आपल्या साहित्यकृतीतून दलित वर्गाचे चित्रण करताना दिसतात. त्यांच्या 'आज पन्नास

वर्षांनी ' या कवितेत त्यांचे मन डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वासमोर आणि कर्तृत्वासमोर कृतज्ञ होताना दिसते. ते आपल्या कवितेतून स्वतःची भूमिका स्पष्ट करतात.

" तू झालास परिस्थितीवर स्वार
आणि घडविलास नवा इतिहास
तू झालास मूक समाजाचा नायक
आणि जागा केलास उभा बहिष्कृत भारत "

त्यांच्या या ओळी - ओळीतून दलितांबद्दल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्याबद्दल असणारी तळमळ दिसून येते. त्यांची कविता अन्यायाविरुध्द लढणारी आहे.

दलित साहित्य समाज—मूल्यांच्या विरोधात भक्कमपणाने स्वतःच्या पायावर उभा आहे. स्वतःचा आदर्श ते शोधत चालले आहे. त्याची वाटचाल यशस्वी दिशेकडे जाताना दिसते. ' दलित साहित्य ' हे नवजागृत समाजाने निर्माण केलेले साहित्य आहे. तसेच ते एक प्रबोधन आहे. 'दलित साहित्य ' व ' दलित चळवळ ' यांचा अतूट संबंध आहे. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स, गौतमबुध्द यांचे तत्वज्ञान या समाजाला निश्चितच नवी दृष्टी देईल. आजही दलित वर्गात एक वर्ग पांढरपेशा व्यवसाय करणारा वर्ग आहे, म्हणून दलित साहित्यासमोर खराखुरा प्रश्न आहे तो ' स्वत्व ' शोधण्याचा व त्यासाठी प्रत्येकाचे सहकार्य हवे. तरच दलित साहित्य खऱ्या अर्थाने यशस्वी होईल.

वरील विवेचनावरुन आपणाला काही निरीक्षणे नोंदवता येतील.

_____ दलित साहित्याने दलितांची अस्मिता जागी केली.

_____ दलित साहित्य प्रस्थापित समाजमूल्यांच्या विरोधात स्वतःच्या पायावर उभे आहे.

_____ दलित साहित्याने अस्पृश्यांची दुःखे समाजासमोर आणली.

_____ दलित साहित्य नव जागृत समाजाने निर्माण केलेले 'साहित्य' आहे.

_____ म. फुले, डॉ. आंबेडकर, मार्क्स, गौतमबुध्द यांच्या तत्वज्ञानाने अस्पृश्यांच्या दुःखाला वाचा फोडली.

_____ दलित व दलितेत्तर साहित्य एकाच समाजाचे घटक असले तरी मूलतः भिन्न भिन्न आहेत.

_____ डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्याचे खरे प्रेरणास्थान आहेत.

या दलित साहित्यानंतर ग्रामीण साहित्याचा विचार करणे क्रमप्राप्त ठरेल.

स्वातंत्र्योत्तर काळात लोकशाही जीवनपध्दती आली. त्यामुळे राजकीय व आर्थिक परिस्थितीत पूर्णपणे बदल झाला. याच काळात ग्रामीण साहित्यात मुख्यतः कथेची उंची वाढली. कथेचा विकास झाला. यामध्ये बहुसंख्य वर्ग हा बहुजन समाजातील असलेला दिसून येतो. लोकजीवन पध्दतीमुळे बहुजन समाजाची अस्मिता जागी झाली. यंत्रयुगामुळे संपूर्ण खेड्यांचे चित्र बदलून गेले. नव्या जाणिवांची, नव्या दृष्टीची कल्पना येवू लागली. साहित्यामध्ये अनुभव व आत्मनिष्ठा यांना स्थान प्राप्त

झाले. नव्या पिढीने व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार यांचे अनुकरण करण्यास सुरुवात केली.

या अनुकरणाबरोबरच विविध भागातून ग्रामीण साहित्य निर्माण झाले. उदा. कोल्हापूर, सांगली, सातारा, खानदेश, मराठवाडा, विदर्भ, कोकण अशा विविध ग्रामीण भागातून साहित्य निर्माण होऊ लागले. अनेक लोकांना साहित्याची जाणीव होऊ लागली. मानवी जीवनात व्यक्तिजीवनाला असणारे स्थान याचा कथेमध्ये शोध सुरू झाला. परंतु कथेचे स्वरूप तेच राहिले. त्यामध्ये कोणताही बदल झाला नाही. त्यामुळे नवीन ग्रामीण कथा जुनीच आहे. अशी चर्चा सुरू झाली.

ग्रामीण कथा व कादंबरी या दोन्हींना एकच दिशा मिळाली. कथेचा विस्तार झाला. विविध भावानुभव व्यक्त होऊ लागले.

१९६० ते १९७० या दशकातील रा.रं बोराडे, आनंद यादव, शंकरराव खरात, बाबा पाटील, मधु मंगेश कर्णिक, महादेव मोरे, सखा कलाल, चंद्रकुमार नलगे, द. ता. भोसले, चारुता सागर इत्यादींच्या कथा- कादंबऱ्यांतून ग्रामीण जीवन आलेले दिसून येते. ग्रामीण माणसांच्या मूलभूत जाणिवा, त्यांचे आचार-विचार, राहणीमान, संस्कृती इत्यादी घटक त्यांना महत्वाचे वाटले.

उदा. - 'धग ', 'माझा गाव ', 'टारफुला ', ' गोतावळा', 'पाचोळा ' इत्यादी कादंबऱ्यांमधे खेड्यांतून झालेला यंत्र आणि विज्ञान यांचा प्रसार, त्यामुळे खेड्यांतून झालेल्या सुधारणा व बदल, यातून निर्माण झालेल्या नवीन समस्या, त्यांचा ग्रामीण मनावर झालेला परिणाम या सर्वांचे दर्शन घडताना दिसते.

१९७० ते १९८० च्या दशकामध्ये ग्रामीण साहित्यात योगीराज वाघमारे, चा. ग. केसकर, आनंद पाटील, सतीश तराळ, बाबाराव मुसळे, उत्तम बंडु तुपे, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे, श्रीराम गुंदेकर इत्यादी लेखकांनी या काळात नव्या जोमाने लेखन केले. ग्रामीण भागाचे अस्सल चित्रण या काळामध्ये घडलेले दिसून येते. याच सुमारास म्हणजे १९७७ मध्ये ग्रामीण साहित्याची चळवळ सुरु झाली.

१९८० नंतर मात्र ग्रामीण माणसाच्या शोषणमुक्तीसाठी महाराष्ट्रामध्ये घडणाऱ्या घटनांचे पडसाद टिपणारे साहित्य निर्माण झाले. यामध्ये कथा, कादंबरी, कविता व तुरळक प्रमाणात नाटय इ. साहित्य निर्माण झाले. या नव्या लेखकांबरोबर डॉ. आनंद यादव, रा. रं. बोराडे, मनोहर तल्हार, चंद्रकुमार नलगे यांच्या लेखनाने नवीन वळणे घेतलेली दिसून येतात. डॉ. आनंद यादव यांच्या ' उखडलेली झाडे ', हा कथासंग्रह आणि नंतरच्या ' झोंबी', ' नांगरणी ', 'घरभिंती ' इत्यादी आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यां, तसेच रा. रं. बोराडे यांच्या ' सावट ', ' आमदार सौभाग्यवती ', ' चारापाणी ' इत्यादी कादंबऱ्याही ग्रामीण भागाचे प्रत्ययकारी दर्शन घडवणाऱ्या आहेत. महादेव मोरे यांची ' झोंबड '; बाबाराव मुसळे यांची ' हाल्या हाल्या दूध दे '; नागनाथ कोत्तापल्ले यांची ' गांधारीचे डोळे '; वासुदेव मुलाटे यांची ' विषवृक्षाच्या मुळ्या ' इत्यादी कादंबऱ्यातून एक नवी दृष्टी, एक नवा भाव स्पष्ट झाला आहे.

तर अनेक कथासंग्रहातून ग्रामीण वर्णने आलेली दिसून येतात. यामध्ये भास्कर चंदनशिव यांची 'जांभळढव्ह', 'मरणकळा', 'अंगारमाती', 'नवी वारुळे', श्रीराम गुंदेकर यांचा 'उचल' आणि सोपान हाळमकर यांचा 'सपन' हा कथासंग्रह या सर्वातून आजच्या ग्रामीण समाजाचे प्रश्न, आणि ग्रामीण भागातील राजकारण, ग्रामीण माणसाच्या अपेक्षाभंगाचे दुःख, तरुण ग्रामीण मनाचा उद्रेक इत्यादी प्रश्न रेखाटलेले आहेत. याशिवाय गणेश आवटे, इंद्रजित भालेराव, रामचंद्र पठारे, इत्यादी लेखकांनी आपापल्या लेखनाव्दारे ग्रामीण साहित्याची भूमी संपन्न केली आहे.

१९९० ते आजअखेर ग्रामीण साहित्याने गांभीर्याने विद्रोहाचा सूर आळवायला सुरुवात केली आहे. ग्रामीण साहित्याची एकूण रुपरेषा स्पष्ट होते आहे. ग्रामीण कथेतील वातावरणाइतकेच महत्त्व निवेदन, संवाद आणि ग्रामीण भाषा यांना असते. संवाद हे स्वाभाविक, जिवंत व वास्तववादी वाटण्यासाठी संवादाची भाषा ही बोलीभाषा असावी हे पूर्वीच मान्य झालेले आहे. ग्रमसंस्कृतीचे सर्व विशेष गावाकडच्या बोलीत प्रगट होत असतात. 'भाषा' हा त्या समाजमनाचा आरसा असतो. म्हणी , वाकप्रचाराव्दारा गावसंस्कृतीचा वेगळा थाट प्रकट होत असतो.

ग्रामीण निवेदन हेही अलंकारिक नसते. तो अनुभवाचा एक अविभाज्य भाग असतो.

अशारीतीने ग्रामीण वाङ्मयातून निसर्ग, राहणीमान, संस्कृती, दर्जा, भाषा, ग्रामीण भाग इत्यादींचा विचार केला जातो. त्याचप्रमाणे बहुजन समाजवर्गाचे चित्रण,

त्यांची सुख-दुःखे यांचाही विचार ग्रामीण साहीत्यातून केला जातो. म्हणून ग्रामीण साहित्य आजही श्रेष्ठ दर्जाचे ठरते.

ग्रामीण साहित्याची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील. :-

- १९७० ते १९८० या दशकामध्ये ग्रामीण भागाचे अस्सल चित्रण घडलेले दिसून येते.
- ग्रामीण कथेमध्ये ग्रामसंस्कृतीचे सर्व विशेष सापडताना दिसतात.
- 'भाषा' हा समाजमनाचा आरसा असतो.

यानंतर आपणास आदिवासी साहित्याचा विचार करावयाचा आहे.

<u>आदिवासी साहित्य</u> :-- १९६० नंतर आदिवासी समाजामध्ये अनेक पध्दतीच्या सुधारणा झालेल्या दिसतात. उदाहरणार्थ, सामाजिक, शैक्षणिक, व सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी बाबतीत त्यांची प्रगती झालेली दिसते. शिक्षणाचे महत्व समजल्यापासून त्यांचा स्वतःचा शैक्षणिक दर्जा उंचावलेला आहे. १९६५ ते १९७५ मध्ये अनेक आदिवासी कार्यकर्त्यांनी शिक्षण संस्था उभारल्या. या संस्थांमधून शेकडो लोक शिक्षण घेऊन उच्च पदावर गेलेले दिसतात. आदिवासींच्या जीवनाचे शिल्पकार मा. बाबुराव मडावी यांचे व इतरांचेही शिक्षण क्षेत्रातील कार्य आदिवासींच्या शैक्षणिक विकासाच्यादृष्टीने फार मोलाचे आहे. आदिवासींचा सर्वांगीण अभ्यास करुन त्यांनी शिक्षणाचे महत्व आदिवासींना पटवून दिले. प्रत्येक घरातील व्यक्ती ही ज्ञानी झालीच पाहिजे. तरच खऱ्याअर्थाने आदिवासींचा सर्वांगीण विकास होईल. १९८० [illegible] [illegible]

१९६० मध्ये गराडा जि. भंडारा येथे भारतीय आदिवासींच्या शैक्षणिक विकासासाठी 'शिव शिक्षण संस्था' नावाचे मंडळ त्यानी स्थापन केले. याच मंडळाच्या माध्यमातून आदिवासी आश्रमशाळा, महाविद्यालये, वसतिगृहे सुरू करून त्यांनी एक नवे शैक्षणिक वातावरण आदिवासींसाठी तयार केले.

१९८० ते १९८५ या काळात व नंतरच्या काळातही अनेक प्राथमिक शाळा, बालकमंदिर, वाचनालये, ग्रंथालये इत्यादी शैक्षणिक दर्जा असणारे कार्यक्रम त्यांनी आखले. या माध्यमातूनच त्यांनी अदिवासींचा सर्वांगिण विकास केला.

इ. स. १९८५ मध्ये आदिवासी कार्यकर्ते श्री. काशिनाथजी आमले यांनी ब्रम्हापुरी या ठिकाणी 'कै. विठोबाजी आमले, बी. एड कॉलेज' आणि 'कै. विठोबाजी आमले हायस्कूल' या दोन शिक्षण संस्था स्थापन करुन आदिवासींचा सर्वांगिण विकास केला. त्यांच्या मुलांसाठी शिक्षण, नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्या. आदिवासी कार्यकर्ते प्रा. डॉ. विनायक तुकाराम यांनी १९७० मध्ये ग्रंथालय चळवळ उभी करुन भद्रावती जि. चंद्रपूर या ठिकाणी ' राणी दुर्गावती वाचनालय' हे पहिले वाचनालय उभे केले. याचा वाचनालयात अनेक आदिवासींना फायदा झाला. त्यांच्यामध्ये वाचनाची आवड निर्माण झाली. आपली प्रगती व्हायची असेल तर काम केले पाहिजे हे त्यांना समजू लागले. आणि त्यांच्या प्रत्येक घरातील व्यक्ती उत्साहाने शिक्षण घेऊ लागली.

इ. स. १९८१ मध्ये त्यांनी मांजरी ( खदान) या ठिकाणी 'एकलव्य शिक्षण प्रसारक मंडळ' स्थापन केले. या मंडळाव्दारे 'गोंडवाना बालक मंदिर' आणि ' क्रांतिवीर नारायणसिंह उईके' या प्रमुख संस्था चालविल्या जातात. १९८४ मध्ये मांजरी याठिकाणीच 'शबरी ग्रंथालय' तर १९८५ मध्ये तेलवासा याठिकाणी भगवान परेसापेन ग्रंथालय' १९८८ मध्ये मरेगाव जि. चंद्रपूर येथे ' बिरसा भगवान ग्रंथालय', १९८९ मध्ये हळदी ( गावगन्ना ) ता. मुल जि. चंद्रपूर येथे ' संत मुगासुजी महाराज आदिवासी ग्रंथालय' स्थापन करुन आदिवासी समाजात साहित्य व शिक्षणाचा प्रसार केला. त्याचप्रमाणे १९८६ मध्ये अखिल भारतीय नारायणसिंहजी उईके संघर्ष समिती' स्थापन करुन आदिवासींच्या प्रबोधनाचे कार्य केले. आणि आजही ते कार्य सुरू आहे. याच कार्यातून प्रा. डॉ. तुकाराम त्यांनी नव्या सुशीक्षित पिढीस क्रियाशिल केले. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाचे झुंजार नेते विठ्ठलराव मसराम यांनी १९७१ मध्ये 'वनवासी' नावाचे प्रत्रक सुरू केले. तर १९८३ मध्ये आदिवासींचे अभ्यासक व कार्यकर्ते शीतल कवडूजी यांनी नागपूर या ठिकाणी ' गोंडवाना आदिवासी' नावाचे पाक्षिक सुरू केले. हे पाक्षिक आजही चालू आहे. आदिवासींचा सर्वांगिण विकास व्हावा हाच दृष्टीकोन आदिवासीतील मान्यवरांचा आहे. तो त्यांनी प्रामाणिकपणे जोपासला. आजही त्यांचे कार्य चालू आहे.

खास आदिवासी लोकांसाठी महाराष्ट्र शासनाने विविध उपक्रम राबविले. हे उपक्रम राबविताना त्यांनी विविध योजना आखून त्यापध्दतीने कार्य सुरु केले. सामाजिक, शैक्षणिक सुधारणेच्या माध्यमातून आदिवासी लोकांचा निश्चित फायदा होईल या दृष्टीने त्यांनी काटेकोर व कडक अशा योजना राबविल्या. पहिल्या पंचवार्षिक योजनेमार्फत शैक्षणिक विकासासाठी अनेक योजना राबविण्यास सुरुवात केली. याच योजनेपासून अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या विमुक्त जाती यांच्या विकास कार्यासाठी विविध योजना संचालक, समाजकल्याण, पुणे. यांच्यामार्फत राबविल्या जात असतात. आदिवासी संचालनालयाची स्थापना १३ जुलै १९७२ मध्ये करण्यात आली. या संचालनालयामार्फत शासकीय आश्रमशाळा, पोस्ट , वसतिगृहे अशा विविध उपयोजना खास आदिवासींसाठी शासनाने राबविल्या आहेत.

तसेच आदिवासी मुलांची प्रगती व्हावी, समाजामध्ये त्यांना चांगले स्थान प्राप्त व्हावे व इतर समाजाप्रमाणे त्यांनाही मानसन्मान मिळावा हा दृष्टीकोन महाराष्ट्र शासनाचा आहे. त्यामुळे खास आदिवासी विद्यार्थ्यांसाठी म्हणजे इयत्ता ८ वी ते १० वी पर्यंत माध्यमिक शिक्षणासाठी एकूण ३८ पोस्ट - बेसिक आश्रमशाळा विद्यादानाचे कार्य मोफत करीत आहेत. आज महाराष्ट्रात या संस्थांची संख्या खूप मोठी आहे. या स्वयंस्फूर्त संस्थांच्या आश्रमशाळांमधून एकूण २५ हजार आदिवासी विद्यार्थी मोफत शिक्षण घेत आहेत.

आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक विकासाबरोबरच त्यांचा शैक्षणिक दर्जाही

सुधारलेला दिसून येतो. इ. स. १९८० - ८१ मध्ये एस. एस. सी. चा निकाल २.५ टक्केपर्यंत होता, तर १९८१ - ८२ मध्ये १७.२५ टक्क्यांनी वाढला. तर १९८२ - ८३ मध्ये ३६ टक्केपर्यंत वाढला. आदिवासींच्या या संख्यात्मक वाढीबरोबरच गुणात्मक वाढही दिवसें- दिवस वाढत आहे. या आदिवासी साहित्यातील श्री. मधुकर वाकोडे यांची 'झेलझपाट' ही कादंबरी महत्त्वपूर्ण आहे.

आदिवासींचा सर्वांगिण विकास योग्य पध्दतीने व्हावा या दृष्टीने आदिवासींतील मान्यवर व्यक्ती व महाराष्ट्र शासन सतत प्रयत्न करताना दिसतात. आज आदिवासींचे अनेक लोक उच्च पदावर असलेले दिसून येतात. आजचा आदिवासी काही अंशी डोंगरदऱ्यात न राहता तो शहरात राहू लागला आहे. आदिवासींची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील .

- इ. स. १९६० नंतर आदिवासींच्या जीवनाला खरी दिशा मिळाली.
- इ. स. १९८० - ८५ पासून आदिवासींचा सर्वांगिण विकास सुरु झाला.
- आदिवासींना स्वतःच्या अस्तित्वाची जाणिव झाली.
- आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी शासन कटीबध्द असलेले दिसून येते.
- आदिवासींच्या व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा म्हणून शाळा, महाविद्यालये या माध्यमातून लक्ष देण्यात आले.

जन साहित्य :-

१९८० नंतर जनसाहित्याचा मराठी साहित्यविश्वात उदय झाला. जनसाहित्य

हे लोकसाहित्य, मार्क्सवादी साहित्य, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य यांचे ऋण मान्य करून अधिक व्यापक भूमिका घेते. जनसाहित्याची संकल्पना द्विध्रुवी आहे. या संकल्पनेत सामाजिक मूल्यात्मकता आणि वाङ्‌मयीन मूल्यात्मकता बरोबरीने चालतात. जननिष्ठा, जाणिवांनी घेतलेला जीवनाचा शोध म्हणजे जनसाहित्य.

जनसाहित्याची कल्पना जुनी आहे. उपनिषदातील सत्यकाम - जाबलेची गोष्ट जनसाहित्याचे उत्तम उदाहरण आहे. जनसाहित्याचे वैशिष्ट्य म्हणजे जनसाहित्याचा संपूर्ण विषमतेला विरोध आहे. त्यामुळे ग्रामीण - नागर हे भेद जनसाहित्याला महत्वाचे वाटत नाहीत. आहेरे आणि नाहीरे किंवा विशेषजन आणि सामान्यजन हे भेद जनसाहित्याला महत्वाचे वाटतात.

माणसाच्या महत्तेचा विचार निश्चयात्मक पध्दतीने मांडला जावा, अनेक अंगाने साहित्याने विकसित व्हावे व मराठीत जागतिक दर्जाच्या कलाकृती निर्माण व्हाव्यात हा जनसाहित्याचा ध्यास आहे. लौकिक जडवस्तुवार हा या साहित्याचा तात्विक आधार आहे. व आर्थिक सामाजिक नियततत्त्ववादाचे भान जनसाहित्य सतत बाळगते.

साहित्याच्या या जनवादी भूमिकेचा उदय साधारणपणे १०० वर्षांपूर्वी २४ मे १८८५ रोजी मराठी लेखकांची जी दुसरी परिषद कृष्णशास्त्री, राजेवाडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती, त्या परिषदेसाठी हजर राहण्याबाबतच्या न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या निमंत्रणास महात्मा फुले यांनी दिलेल्या पत्रोत्तरातून झाला त्यानंतरच्या काळात विभावरी शिरुरकर यांच्या 'बळी' व 'शबरी'

या अनुक्रमे आदिवासी व स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडणाऱ्या कादंबऱ्यांतून ही जनवादी भूमिका स्पष्ट झाली. त्यानंतर मनोहर तल्हार यांची ' माणूस '; श्री ना. पेंडसे यांची ' रथचक्र '; आनंद यादव यांची ' गोतावळा ' या कादंबऱ्यांतून जशी ही भूमिका स्पष्ट होते. तशीच बाबूराव बागूल यांच्या ' जेव्हा मी जात चोरली होती ' व रा. रं. बोराडे यांच्या 'मळणी' या कथासंग्रहातूनही ही भूमिका स्पष्ट होते. या प्रवाहाच्या अवलोकनानंतर या कालखंडातील प्रमुख वाङ् मय प्रकारांचा विचार करावयाचा आहे.

कथा :- १९६० नंतरची मराठी कथा आणखी एका वेगळ्या अंगाने समृध्द बनली. जीवनातील रहस्यमय घटनांचा व वाङ्मयीन जाणिवांचा परामर्श १९६० नंतरच्या कथांतून आलेला आहे. विविध वासना, नैराश्य, यांत्रिकता, विफलता, अर्थशून्यत्व, विकृत मनोवृत्ती या सर्वांचा शोध अनेक कथांच्या माध्यमातून होत राहिला आहे. धर्म, नीती, संस्कृती', परंपरा,कौटुंबिक नाती या सर्वांची पडझड केव्हाच झाली होती. आत्मकेंद्रित माणसाने स्वतःचे , स्वतःपुरते असे जग निर्माण केले होते . कामवासना, विकृत मनोवृत्ती धीटपणे मराठी कथातून प्रकट होत राहीली. त्याचप्रमाणे विविध प्रकारांचे भावसंबंध, नीती-अनीतीच्या कल्पना कथांतून येऊ लागल्या.

१९६५ नंतर मात्र ग्रामीण कथा लहानमोठ्या मोहातून मुक्त होऊन कलात्मकतेच्या दिशेने अधिक जागरुकतेने वाटचाल करताना दिसते या काळात ग्रामीण जीवन ,त्यांची भाषा , त्यांचे राहणीमान , त्यांचा दर्जा इ. वैशिष्टेही ग्रामीण कथेतून आलेली दिसून येतात. ग्रामीण जीवनात एक गतिचिन्ह दिसून येते. नव्या-नव्या विकास योजना खेड्यापाड्यात दिसू लागल्या. कारखाने निघाले, शिक्षणाचा प्रसार सर्वत्र झाला.

विज्ञानाचे वारे घराघरात पोचले. वळणवळणाने गावांची सुधारणा झाली. त्यांचे दडपलेले जीवन मोकळेपणाने साहित्यात येवू लागले. एक नवी पिढी नव्या जाणीवेने लिहू लागली. अशा रीतीने १९६०-६५ च्या सुमारास साहित्यात नवनिर्मितीची लाट येऊ लागली.

या काळात जी.ए. कुलकर्णी, चिं.त्र्यं. खानोलकर ,विद्याधर पुंडलीक , दिलीप चित्रे, कमल देसाई, विजया राजाध्यक्ष, श्री.दा.पानवलकर, शरच्चंद्र चिरमुले,इ. नवीन कथा लेखकांची पिढी पुढे आली. त्यांची कथा एका व्यक्तीच्या भोवती न फिरता संपूर्ण समूह दर्शन घडवून त्यांतून माणसाचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागली. हा माणसाचा शोध घेताना त्यांना जीवनाच्या वैफल्याची आणि एकाकीपणाची जाणीव झाली.

अशारीतीने एकूण मराठी कथेला अगदी वेगळ्या टप्प्यावर आणण्याचे महत्वाचे कार्य करणाऱ्या या काळातील आघाडीच्या कथाकाराविषयी पुढीलप्रमाणे सांगता येईल. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथा जीवनाचा वेध घेणाऱ्या कथा आहेत. जीवनाचा शोध विविध अंगांनी घेण्यात त्यांच्या कथा रमलेल्या दिसतात. त्यांच्या कथा मानवाच्या अथांग दुःखाचा वेध घेताना दिसतात. त्यांच्या प्रत्येक पात्राचे दुःख वेगळे आहे. यातना अनेकदा विपरीत असतात. त्यांच्या दुःखाचा उगम अनेकवेळा नियतीत असतो. तर अनेकदा सामाजिक विद्रोहात असतो. त्यांच्या कथा कोणत्याही चौकटीत बसू शकतील. अशा नाहीत तर त्यांच्या दुःखाची जातच वेगळी आहे म्हणून त्यांच्या कथा आजही वाचनीय ठरतात. उदा. ' निळा सावळा ' , ' पारवा ' , ' हिरवे रावे ' , ' रक्तचंदन ' , ' काजळमाया ' , ' सांजशकुन ' , ' पिंगळावेळ ' , ' रमणखुणा ' इत्यादी.

दिलीप चित्रे हे या कालखंडातील एक महत्त्वाचे कथाकार, त्यांच्या कथांचे स्वरूप इतर कथाकारांपेक्षा खूप वेगळे आहे. त्यांच्या अनेक कथा, नीती-अनीती, श्लील-अश्लील या वर्गीकरणाच्या पलिकडे असतात. एका दृष्टीने त्यांची भूमिका सामाजिक व नैतिक मूल्यांवर आघात करणाऱ्या विद्रोहाची वाटते. त्यांच्या 'आर्फियस ' या कथासंग्रहातील कथांतून चित्रे वासनात्मक देहाच्या माध्यमातून मानवी भावबंधांचा अर्थ लावताना दिसतात. ते म्हणतात " माझा लेखन स्वभाव निव्वळ वाङ्मयीन संस्कारातून उत्पन्न झालेला नाही, तर स्वतःच्या अस्तित्व शोधाशी तो जडलेला आहे."[५] 'अस्तित्वशोध ' हाच त्यांच्या कथेचा गाभा आहे. त्यांच्या ' स्कार्पिओ ', ' जाराचं स्वागत ', ' केसाळ काळेभोर पिल्लू ', व्हायरस ', ' टाईपरायटरची गोष्ट ' इत्यादी कथा वाचनीय आहेत.

चिं. त्र्यं. खानोलकर यांनी थोड्याच कथा लिहिल्या, पण त्या वाचकांची मने खिळवून ठेवतात. कथेच्या क्षेत्रात त्यांनी आपले वेगळे स्थान निर्माण केले. त्यांचे कथेबरोबर कादंबरी, काव्य, नाटक इत्यादी वाङ्मयप्रकारातही महत्त्वाचे योगदान आहे. त्यांनी कथेबाबत सूक्ष्म अवलोकन, कल्पनाविलास व मानवी जीवनातील अतर्क्यता आणि अद्भुतता यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या उत्कृष्ट कथा म्हणजे ' खेळ ', हाक ', ' भारवाही ', सनई ', ' रेषा ', ' हाडकुळा ' इत्यादी होत.

शरच्चंद्र चिरमुले यांनी अतिशय मोजके व भावपूर्ण कथालेखन केले. उदा. '

श्रीशिल्लक ', ' आवर्त ', ' दि मर्मन ', ' युधिष्ठिराचा रथ ' इत्यादी कथांतून ते मानवी मनाचा शोध घेतात.

विजय तेंडुलकरांनी समाजातील व्यंगांचा उपरोधाने निर्देश केला आहे. त्यांच्या अनेक कथांतून उपहास, विनोद, विडंबन, इत्यादी वैशिष्ट्ये येतात. त्यांच्या कथा समाजातील वास्तवाचे अस्सल चित्रण करताना दिसतात. उदा. ' काचपात्रे ', ' मेणपात्रे ', ' गाणे ' इत्यादी त्यांचे कथासंग्रह प्रसिध्द आहेत. तसेच ' उकल ', 'सौभाग्य ', ' केशव ', ' हरवलेली माणसे ', ' रात्र वैऱ्याची आहे,' ' ज्याची त्याला प्यार कोठडी ' अशा विविध कथांतून ते स्त्रीपुरुषांच्या विविध नात्यांचे वा संबंधाचे चित्रण करताना दिसतात.

ए.वि. जोशींच्या कथातून नव्या- नव्या अनुभूतींचे आणि जीवनाच्या नवनव्या पैलूंचे दर्शन घडते. त्यामुळे प्रत्येक पात्रांची अनुभव घेण्याची व ती अभिव्यक्त करण्याची पध्दती कशी भिन्न आहे, ते जाणवते. काम- विकृतींचा गंड हा बऱ्याच कथाकारांच्या कथांचा विषय झाला आहे. मानवी जीवनाच्या अर्थशून्यतेची, वैफल्याची व एकलेपणाची जाणिव दिसून येते. उदा. ' कोणाच्या हातातल्या गोष्टी,' ' पुरुषोत्तम व नारळीचे पाय', ' आमंदस ', ' पूर ,' ' आंधळी जीप, ' ' चाहूल ', ' नको रे कृष्णा रंग टाकू' इत्यादी .

जयवंत दळवींच्या कथेतून प्रामुख्याने कामप्रवृत्तीचे चित्रण येते. त्यांच्या कथासंग्रहात ' गहिवर,' ' एदीन,' जळातील मासा,' ' आश्रम,' ' फजितवाडा,' या कथा

प्रसिध्द आहेत. गहरी प्रेमभावना, हा त्यांच्या कथेचा मुख्य विषय आहे.

मधु मंगेश कर्णिक हे मराठी कथेमधील महत्वाचे कथाकार आहेत. त्यांच्या कथा म्हणजे ' पारध,' ' मुईचाफा,' ' मेत्र,' ' मांडव,' ' डोलकाठी,' ' तहान,' ' कोकणी ग वस्ती ' अशा भावमधुर व कोकणच्या पार्श्वभूमीवरील कथा त्यांनी लिहिल्या आहेत.

साठोत्तरी काळात स्त्रियांनी कथा—लेखन केलेले दिसते. त्यांच्या कथेमध्ये सामाजिक चित्रणाबरोबर ते त्यांच्या वैयक्तिक जीवनापर्यंत त्यांच्या कथा दिसतात. याकाळात अनेक स्त्रीकथाकार आहेत. त्यामध्ये सरिता पदकी, तारा वनारसे व वसुधा पाटील यांच्या कथा नवा तोंडावळा घेऊन येतात. याच काळात कथालेखनात आपले वेगळे असे व्यक्तिमत्व प्रगट करणाऱ्या सुधा नरवणे, ज्योत्स्ना देवधर, इंद्रायणी सावकार, शंकुतला गोगटे, शैलजा राजे इत्यादी कितीतरी नावे पुढे येतात.

अगदी आजच्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गौरी देशपांडे, उर्मिला शिरुर, राणी उपाध्ये, सानिया इत्यादी कथा लेखिका आपला वेगळा ठसा उमटवीत आहेत. तसेच सुधा नरवणे, अंबिका सरकार, सुकन्या आगाशे, आशा बर्गे, रोहिणी कुलकर्णी, गौरी देशपांडे, सानिया, सुनिता आफळे, प्रिया तेंडुलकर, इत्यादींचे कथालेखन प्रगल्भ, संवेदनशील आणि निष्ठापूर्ण वृत्तीने घडत आहे. अशारीतीने मराठी कथेचा विकास विविध अंगानी होताना दिसतो. काही मोजकेच लेखन जीवनानुभव कलाकृतींच्याद्वारे व्यक्त करण्याचा प्रयत्नही प्रामाणिकपणाने होत आहे.

संख्यात्मक व गुणात्मक कथाविकासास हातभार लावणाऱ्या आणखीही अनेक कथाकारांचा उल्लेख करण्यासारखा आहे.

यामध्ये आनंद यादव, ग. दि. माडगूळकर, उध्दव शेळके, श्रीपाद काळे, चारुता सागर , वा. गो. देशपांडे, श्याम मनोहर, क. वि. सोनटक्के, वि. शं. पारगांवकर, नरेश, बाळकृष्ण वि प्रभुदेसाई, अनिल डांगे, ग. वा. बेहेरे, व. ता. भोसले, चंद्रकुमार नलगे, सखा कलाल, रंगराव बापू पाटील, भास्कर चंदनशिव, विलास सारंग, रंगनाथ पठारे, गणेश आवटे, भाऊ पाध्ये, राजेंद्र बनहट्टी, भारत सासणे, बाबुराव बागूल इत्यादी कथालेखकांचा समावेश होतो. या विवेचनाद्वारे काही निरीक्षणे पुढील प्रमाणे मांडता येतील --

- १९६० नंतर खऱ्याअर्थाने मराठी ग्रामीण दलित कथेचे दालन समृध्द बनले.
- विविध वासना, नैराश्य, यांत्रिकता, विफलता, अर्थशून्यता, विकृत मनोवृत्ती या सर्वांचा शोध कथांच्या माध्यमांतून घेवू लागला.
- विविध प्रकारचे भावसंबंध, नीती, अनीतीच्या कल्पना यांना वाचा फुटली.

यानंतर आपणांस कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा विचार करणे क्रमप्राप्त आहे.

<u>कादंबरी</u> :- १९६० - ६१ मध्ये खऱ्याअर्थाने कादंबरीला मुक्त वातावरणामध्ये स्वतःच्या वेगवेगळ्या रुपांचा शोध घेणे शक्य झालेले आहे. या काळात व्यंकटेश माडगूळकर, उध्दव शेळके, गो. नि. दांडेकर, श्री. ना. पेंडसे, इत्यादी कादंबरीकारांनी आपल्या

वेगवेगळ्या शैलीतून लेखन केले. या लेखकांना फडके युगातील कादंबरीच्या साचेबंद रुपाची जाणीव झाली.

भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीने क्रांती केली. कादंबरी लेखनाविषयीचे पूर्वीचे सगळे संकेत त्यांनी मोडून काढले. नव्या भावविश्वाशी, नव्या तरुणाच्या भावभावनांशी नाते सांगणारी ही कादंबरी आहे. तिचा प्रभाव पुढील काळातील कादंबरी-लेखनावर निश्चितपणे झालेला आहे.

याच कालखंडात रणजित देसाई यांच्या 'स्वामी' (१९६२) या कादंबरीला अमाप लोकप्रियता मिळाली. ही कादंबरी 'थोरले माधवराव पेशवे' यांच्या जीवनावर आधारित आहे. एकूण माधवरावांच्या जीवनाचा विचार या कादंबरीतून केलेला दिसतो. म्हणून ही कादंबरी लोकप्रिय ठरली. त्याच प्रमाणे श्री. ज. जोशी यांच्या 'आनंदी गोपाळ' (१९६८), जयवंत दळवी यांच्या 'चक्र' (१९६३), केशव मेश्राम यांची 'हकीगत व जटायु' (१९७२), इत्यादी कादंबऱ्यांमध्ये विविध विषय घेवून या कादंबऱ्या यशस्वी ठरल्या आहेत. यामध्ये मुंबईतील झोपडपट्टीत राहणाऱ्या व्यक्तीच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच गावकुसाबाहेर जीवन जगणाऱ्या अनेक लोकांची वर्णने केली आहेत. त्यामुळे या कादंबऱ्या श्रेष्ठ ठरल्या आहेत.

याच सुमारात अनेक कादंबऱ्या निर्माण झालेल्या आहेत. त्या म्हणजे पु. शि. रेगे यांची 'सावित्री' (१९६२), चिं. त्र्यं. खानोलकर यांची 'अजगर' (१९६३),

ए. वि. जोशी यांची 'काळोखाचे अंग' (१९६२), व. ह. पिटके यांची 'शिदोरी' (१९६९), वि. ज. बोरकर यांची 'अनाहत' (१९७०) मनोहर शहाणे यांची 'पुत्र' (१९७१), आनंद यादव यांची 'गोतावळा' (१९७१), वसंत वरखेडकर यांची 'प्रतिनिधी' (१९७१), अरुण साधू यांची 'मुंबई दिनांक' (१९७२), किरण नगरकर यांची 'सात सक्कं त्रेचाळीस' (१९७४) इत्यादी कादंबऱ्याचा उल्लेख करता येण्यासारखा आहे. वरील कादंबऱ्यातून सामाजिक दृष्टिकोन मांडण्याचा यशस्वी प्रयत्न कादंबरीकारांनी केला आहे. म्हणून आजही या कादंबऱ्या वाचनीय ठरतात.

जुन्या पिढीतील कादंबरीकार ना. सी. फडके यांची 'गीत जुने, सूर नवे' व द. र. कवठेकर यांची 'आशियांना', भा. द. खेर व शैलजा राजे यांची 'यज्ञ' भीमराव कुलकर्णी यांची 'ओंकार', श्री. ज जोशी यांची 'आनंदी गोपाळ' इत्यादी कादंबऱ्या १९६८ मध्ये प्रसिध्द झाल्या आहेत.

आजच्या पिढीचे मनोगत लिहिणारे अनेक कादंबरीकार आहेत. यामध्ये जयवंत दळवी 'स्वगत', चिं. त्र्यं. खानोलकर 'त्रिशंकू,' राजा राजवाडे 'चांदण्यातलं ऊन,' 'कागदी गुलाब', अनंत फाटक 'नाती दोन दिसांची,' श्रीकांत पुरोहित 'दिशाभूल', वि. शं. पारगावकर 'पांढरी माती', पद्माकर गोवईकर 'बहरलेल्या हिवाळ्यात' इत्यादी कादंबऱ्या श्रेष्ठ दर्जाच्या आहेत.

१९६९ मध्ये 'मंत्रावेगळा'- ना. सं. इनामदार, 'अग्निदिव्य'- अण्णाभाऊ साठे 'दर्या भवानी'- गो. नि. दांडेकर, 'महापुरूष'- आनंद साधले 'विश्वंभर

देवरस ' - रंगनाथ देशपांडे ' छाया झालीसे प्रकाश ' - लीलावती भागवत, ' जन हे वोळतु जेथे ' - शरच्चंद्र मुक्तिबोध, ' वावर ' - प्र. ना. शेणई इत्यादी कादंबऱ्या या कालात उलेखनीय आहेत.

१९७२ मध्ये ' दोन भिंती ' - पु. भा. भावे, ' उभे धागे, आडवे धागे ' - ग. दि. माडगूळकर, ' रेणूका ' ' जन्मदुर्दैवी ' - ग. त्र्यं. माडखोलकर, ' मी मुक्त, मी मुक्त ' - शंकरराव खरात, ' इंद्रायणीकाठी ' - रवींद्र भट, ' मृत्युंजय आम्ही ' - केशव केळकर, ' उदी ' - वसंत वैद्य , ' रजिया ' - इंदुमती केळकर इत्यादी कादंबऱ्या चारित्रात्मक म्हणून प्रसिध्द आहेत.

१९७४ मधील काही कादंबऱ्या व स्त्री कादंबरीकार यांचा उल्लेख याच काळामध्ये करता येईल यामध्ये ' स्वप्न येती सरे ' द. र. कवठेकर, ' होमसिक ब्रिगेड ' - भाऊ पाध्ये तर स्त्री कादंबरीकारांमध्ये कमल गाडगीळ, लीला श्रीवास्तव, वासंती इनामदार, उषा कोल्हटकर, मंदाकिनी अष्टीकर, ललिता बापट, संजीवनी देशमुख इत्यादी कादंबरीकार प्रसिध्द आहेत.

१९७५ ते १९७९ मधील कादंबऱ्या यामध्ये ' रुपाली रहस्य ' - गो. नी. दांडेकर, ' पुतळा ' ज्योत्स्ना देवधर, ' वस्ती ' - महादेव मोरे, ' शहेनशहा ' - ना. स. इनामदार, थँक यू मिस्टर ग्लाड ', ' डोंगर म्हातारा झाला ' - अनिल बर्वे, ' उगवतीचे रंग ' - भा. ल. पाटील, ' अंधांग ' - जयवंत दळवी, ' मीरा चरणकर ' - व.द्व. पिटके, ' रघुनाथाची बखर ' - श्री. ज. जोशी इत्यादी कादंबरीकारांनी विविध

विषयांवर आपले लेखन केले उदा. स्त्री- पुरुषांच्या वासनांचे निरनिराळे नमुने, राजकीय पार्श्वभूमी, चरित्रात्मक विचार, तसेच प्रतिष्ठित माणसाच्या वासनेचे व भोगवृत्तीचे प्रदर्शन इत्यादी विषय वरील कदंबऱ्यांतून आलेले दिसतात.

अरुण साधू हे अलीकडेच एक समर्थ कादंबरीकार असून पत्रकारांच्या दृष्टिकोनातून त्यांनी नव्या मानवी विश्वाची गुंतागुंत प्रत्यक्ष पाहिली असल्यामुळे 'मुंबई दिनांक' ही त्यांची कादंबरी विशेष गाजली. 'बहिष्कृत' ही त्यांची आणखी एक कादंबरी आहे. तर 'सिंहासन' या कादंबरीमध्ये सत्तासंपादनासाठी चाललेले राजकारण हा एकमेव विषय आहे. 'सिंहासन' या कादंबरीत सी. एम., अर्थमंत्री, लफडेबाज स्पीकर, रावसाहेब टोपले, माणिकराव पाटील, दत्ताजीराव जाधव, भगवानराव कुणगेकर, मारोतराव पवार, अनेक आमदार या सर्वांचे सगे-सोयरे, दिगू टिपणीस सारखा वार्ताहर, सर्वसामान्य प्रजा इत्यादींच्या संदर्भात सत्तासंघर्षाचे जिवंत चित्रण आहे. तसेच या नंतरच्या कालखंडात रंगनाथ पठारे, राजन गवस, विश्वास पाटील, अनंत सावंत, चांगदेव कांबळे इत्यादी महत्वाचे कादंबरीकार येतात.

उषा हस्तक यांच्या मते, " मराठी कादंबरीच्या विकासाबाबत साकल्याने विचार करता असे म्हणावे लागते की, उत्तुंग प्रतिभेच्या कादंबरीकारांचा अभाव अजूनही तीव्रतेने जाणवत आहे. पण असे असले तरी सध्या अत्यंत संवेदनाशील वृत्तीच्या, तीव्र बुध्दिमत्तेच्या, धीटपणे कोणत्याही अनुभवाचे दर्शन घडवू शकणाऱ्या आणि जागतिक पातळीवरील वाङ्मयाच्या क्षेत्रातील विविध प्रकृती प्रवाहांची जाण

असणाऱ्या कादंबरीकारांची संख्या हळूहळू वाढत असल्यामुळे मराठी कादंबरीचे अधिक मोठी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य वृध्दिंगत होत आहे ". [६] उषा हस्तकांचे हे मत कोणाही अभ्यासकाला स्वीकारावेसे वाटेल.

वरील विवेचनावरून कादंबरी वाङ्मयप्रकाराची पुढील प्रमाणे वैशिष्टये सांगता येतील :-

_____ स्त्री- पुरूषांच्या वासनेचे निरनिराळे नमुने, राजकीय पार्श्वभूमी तसेच प्रतिष्ठित माणसांच्या वासनेचे व मनोवृत्तीचे प्रदर्शन आजच्या कादंबरीने केले.

_____ या काळातील कादंबरीने ग्रामीण जीवनाची सुख-दुःखे लोकांपर्यंत पोहचवली.

_____ एक सामाजिक परिवर्तन या काळातील कादंबरीने अप्रत्यक्षपणे केले.

_____ १९६० नंतरच्या कादंबरीने सामाजिक दृष्टिकोन मांडण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

या नंतर नाटकांचा विचार करावा लागेल.

नाटक :- १९६० नंतर नाटकांविषयी नव्या जाणिवा, नवे प्रबोधन अधिक प्रमाणात होवू लागले. या काळातच विजय तेंडुलकर, पु.ल. देशपांडे या नाटककारांनी विपुल नाटयलेखन केले आहे. १९६० ते १९८० या काळात नवनवीन नाट्य संस्था निर्माण झाल्या. या काळातच नवीन नाटयवर्ग निर्माण झाला. या नाट्यकलाकृतीमध्ये

संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही स्तरांचा आलेख सर्वलक्षी बनलेला दिसून येतो. याच कालातल्या नाट्यकृतींनी अनेक प्रश्न मांडले. नया जाणता प्रेक्षक वर्ग निर्माण झाला. एकूण रंगभूमीचे वातावरण चैतन्यदायी बनलेले दिसते.

नाटयक्षेत्रामध्ये अतिशय महत्वपूर्ण कामगिरी करणारे प्रा. वसंत कानेटकरांचा ' वेड्याचे घर उन्हात ' पासून ते ' पंखांना ओढ पावलांची ' या नाट्यापर्यंतचा प्रवास म्हणजे विविध स्तरांवरल्या, विविध प्रकृतीच्या अनुभवांचा नाटयाविष्कार आहे. 'अश्रूंची झाली फुले ' (१९६६) सारखा सत्य आणि व्यवहारातल्या संघर्षाचा मेलोड्रामा ते उभा करतात. ' घरात फुलला पारिजात ' (१९६६) मध्ये संकटातील पतीपत्नींच्या नात्याचे एक दुर्मिळ चित्र उभे राहते. ' लेकुरे उदंड झाली ' या नाटकातलि ' My Fair Lady ' तील पाश्चात्य गीतात्मक रचनेचा प्रयोग ' मीरा मधुरा ' ' नलदमयंती स्वयंवर 'मधील पौराणिक कथानकातून तर ' रायगडाला जेव्हा जाग येते ' मध्ये ऐतिहासिक कथानकातून मानवी नाटयाचा शोध घेण्याचा दृष्टिकोन दिसून येतो. ' इथे ओशाळला मृत्यू (१९६०), ' तुझा तू राजा ' (१९६९) ही त्यांची आणखी दोन महत्त्वाची नाटके. त्यांनी काही व्यक्तिप्रधान नाटकेही लिहिली आहेत.... ' हिमालयाची सावली ' (१९७७), ' कस्तुरीमृग ' (१९७६) , ' विषवृक्षाची छाया (१९७५),

वि. वा. शिरवाडकरांच्या 'दुसरा पेशवा ' यामध्ये बाजीराव पेशवे यांच्या वैयक्तिक जीवनातील नाटय, त्यांच्या मनातील कल्लोळाचे दर्शन नाटककाराने घडविले आहे. त्यांचे ' आमचं नाव बाबूराव ' हे राजकीय व्यंगात्म - लोकनाटयाचा आधार

घेणारे नाटक आहे.

शिरवाडकरांच्या कवी प्रतिभेने मराठी नाटकातील गद्यप्राय, कल्पनाशून्य, प्रसंगी छायाचित्रणासारखी भासणारी वास्तवता दूर करून नाट्यानुभवाला काव्यात्मकपातळी देण्याचा प्रयत्न केला. 'नटसम्राट' (१९७१) हे 'किंग लियर' या शेक्सपियरच्या शोकांतिकेतून मूळ कल्पना घेऊन लिहिलेले नाटक मराठी रंगभूमीवर मानदंड होऊन राहिले. शिरवाडकरांची एकूण नाटके सामाजिक जीवनावर आधारित आहेत.

विद्याधर गोखले यांनी संगीत नाटकाची परंपरा काही अंशी चालू ठेवली. संगीत नाटक ही मराठी नाट्येतिहासातील एक 'मर्मबंधातली ठेव' आहे. किंम्बहुना कित्येक वर्षे मराठी नाटक म्हणजे संगीत नाटकच असे समीकरण होते. आज 'सौभद्र', स्वयंवर', त्या संगीत नाटकांचे स्वागत होत असलेतरी प्रत्यक्षात त्या प्रकारचे संगीत नाटक निर्माण होत नाही. त्यामध्ये गोखले यांची नाटके आहेत. ती म्हणजे 'पंडितराव जगन्नाथ.' 'मंदार-माला' 'स्वरसम्राज्ञी' इत्यादी.

रणजीत देसाई :- यांचे 'हे बंध रेशमांचे', 'तानसेन', गोपाळकृष्ण भोबे यांचे ' धन्य ते गायनी कळा " ही नाटके प्रसिध्द आहेत. तर पुरुषोत्तम दारव्हेकरांनी 'वऱ्हाडी माणसं', 'चंद्र नभीचा ढळला', 'नयन तुझे जादूगार' अशी वेगवेगळ्या विषयावरची, वेगळ्या पध्दतीची नाटके लिहिली आहेत. परंतु त्यांना 'कट्यार काळजात घुसली' ने सर्वाधिक प्रसिध्दी मिळाली.

विजय तेंडुलकरांचे 'घाशीराम कोतवाल' आणि पुरुषोत्तम दारव्हेकर यांचे 'अलवारा डाकू' या दोन नाटकातील लोकसंगीताच्या वापराने नाटकातील संगीत संकल्पनेला एक वेगळे परिमाण लाभले.

या काळातच काही विनोदी नाटके निर्माण झाली. यामध्ये पु. ल. देशपांडे यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. त्यांची 'अमंलदार', 'तुझे आहे तुजपाशी,' सुंदर मी होणार', 'ती फुलराणी', 'भाग्यवान', 'तुका म्हणे', 'तीन पैशाचा तमाशा' इत्यादी नाटके प्रसिध्द आहेत. त्यांच्या नाटकांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी समाजातील गरीब, श्रध्दाळू, विश्वासू, मध्यमवर्गीय इत्यादी लोकांची स्वभाव वैशिष्ट्ये प्रत्ययकारीपणे रेखाटली. त्यांच्या नाटकात 'माणूस' हा केंद्रस्थानी असलेला दिसून येतो.

शं. गो. साठे यांचे 'ससा आणि कासव' तेंडुलकरांचे 'कावळ्याची शाळा' या दोन्ही नाट्यकृती विनोदी म्हणून प्रसिध्द आहेत. वसंत सबनीस यांच्या 'विच्छा माझी पुरी करा' या वगनाट्यातून समाज भाष्य येते. या विनोदी नाटकांबरोबर काही प्रहसनांची (फार्सची) निर्मिती झाली. ती म्हणजे बबन प्रभूकृत 'झोपी गेलेला जागा झाला', 'विनूच्या सासूबाई राधाबाई' हे फार्स आजही महत्त्वाचे वाटतात.

याच बरोबर काही भारतीय भाषांतील नाटके मराठीत आली. आणि मराठीतील काही नाटके अन्य भारतीय भाषांत गेली. अनुवादित वा रूपांतरीत केल्या गेलेल्या नाटककारांमध्ये पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, चिं. त्र्यं. खानोलकर,

विजय तेंडुलकर, गिरीश कर्नाड, मोहन राकेश, आद्य रंगाचार्य, शंभू मित्रा, बादल सरकार, उत्पल दत्त इत्यादींचा समावेश होतो.

१९६० नंतर काही स्त्री नाटककारांनी नाटके लिहिली. त्यामध्ये सरिता पदकी, यांची 'बाधा', 'खून पाहावा करुन', 'एक प्रेम झेलू बाई' इत्यादी तर ज्योत्स्ना भोळे यांचे 'आराधना' या नाटकांचा समावेश होतो.

सतीश आळेकर :- हे आजच्या नाटककारात महत्वाचे नाटककार आहेत. त्यांच्या नाटकातून कौटुंबिक, सामाजिक, संचित, माणसांचे भास - आभास, प्रतिमा यांचे जग इत्यादी वैशिष्टये त्यांच्या अनेक नाटकातून स्पष्ट होतात. 'महानिर्वाण' 'मिकी आणि मेमसाहेब', 'शनिवार - रविवार' या नाटकातून दिसणारे आळेकरांचे नाट्यबिम्ब वेगळे आहे. त्यांच्या नाटकात एकमेकांशी संवाद साधू न शकणारी जवळच्या नात्यातील दोन माणसे जे खेळ खेळतात. वा त्यांचे भूतकाळाशी वा भविष्यकाळाशी जे नाते असते त्यातून विरुपार्थता (Absurdity) व्यक्त होते.

अच्युत वझे :- 'षड्ज' (१९७३), 'चल रे भोपळ्या टुणूक टुणूक' (१९७०), 'सोफा कम बेड' (१९७५), 'सायसाखर,' 'पावसाचे नाटक' इत्यादी नाटके मराठी रंगभूमीवर आलेली दिसून येतात. वझ्यांच्या नाटकात शहरी लोक, यंत्राचे आक्रमण, व्यापारी जग आणि पूर्वसिध्द संकल्पनाचे अहसर या सर्वामध्ये चाललेली माणसांची धडपड दिसते.

श्री. गो. पु. देशपांडे यांचे 'उद्ध्वस्त धर्मशाळा' (१९७४) हे नाटक

त्यातील अनुभव आणि नाटयाचे सादरीकरण यासाठी उल्लेखनीय आहे. एका प्राध्यापकाच्या विभागीय चौकशीच्या स्वरुपात समोर येणारे हे नाटक आहे.

श्री. विद्याधर पुंडलीक :- यांनी 'माझा द्रौपदी' हे नाटक लिहून मराठी पौराणिक नाटकाला एक नवे परिमाण दिले. विद्याधर पुंडलिकांनी पुराण कथेच्या अर्थाचा हा स्तर जाणिवपूर्वक वापरलेला दिसून येतो. त्यांचे दुसरे नाटक 'चार्वाक' ' हेही प्रसिध्द आहे. मानवी मनाची सनातन आंदोलने, महाभारतीय सूत्रातून व्यक्त करणाऱ्या या नाटकातून विनाश आणि विश्वसातत्य यांतील अर्थपूर्ण ताणही पुंडलिकांनी व्यक्त केला आहे.

१९७० ते १९८० या दशकात अनेक नाटके निर्माण झाली. ही नाटके सामाजिक, पौराणिक, ग्रामीण, लोकरंजनपर इत्यादी स्वरुपाची आहेत. त्यात सई परांजपे यांच्या 'जास्वंदी' (१९७६) या नाटकाचा आणि 'नांदा सौख्यभरे' या फ्रेंच (Rerea) च्या धर्तीच्या नाट्यसंहितेचा उल्लेख करणे गरजेचे वाटते. श्री. अनिल सोनार यांनी सामाजिक वास्तवाची जी नाटयरुपे सादर केली त्यांचे 'सारे प्रवासी तिमिराचे' आजच्या तरुण पिढीला ज्या सामाजिक वास्तवाला सामोरे जावे लागते, त्यांची रुपरेखा अतिशय योग्य पध्दतीने मांडण्याचा प्रयत्न करते.

रत्नाकर मतकरी हे हौशी, प्रायोगिक आणि आता व्यावसायिक नाटककार म्हणून ओळखले जातात. त्यांची अनेक नाटके आहेत. त्यामध्ये प्रायोगिकदृष्टया महत्त्वाची म्हणजे 'लोककथा ७८', 'आरण्यक' ही होत, त्यांची 'माझं काय

चुकले ', ' अश्वमेध ', खोल खोल पाणी ' इत्यादी व्यावसायिक नाटकेही प्रसिध्द आहेत.

या कालखंडातील विजय तेंडुलकर हे महत्वाचे नाटककार आहेत. ' 'कावळ्याची शाळा ', ' श्रीमंत ', ' माणूस नावाचे बेट ' ही १९६० पूर्वी तर त्यानंतर ' गिधाडे ' ' शांतता कोर्ट चालू आहे ' 'अशी पाखरे येती ' ' सखाराम बाईंडर ' ' 'पाहिजे जातीचे ' ही महत्वाची नाटके आहेत. तर अनिल बर्वे यांनी ' कोलंबस वाट चुकला ', ' थँक यू मिस्टर ग्लाड ' (१९७७), ' हमीदाबाईची कोठी, ' ' फुकामेस्टी ' (१९८०) इत्यादी नाटके लिहिली.

श्री. विश्राम बेडेकर यांनी ' वाजे पाऊले आपुले ' ही रूपांतरित सुखात्मिका आणि ' टिळक आणि आगरकर ' (१९८०) हे स्वतंत्र नाटक लिहिले.

१९८० नंतर काही तरुण लेखक नव्या नाट्य - लेखनात मुक्तनाट्याचा त्याहीपेक्षा ' (Total Theatre )' चा सर्वकष रंगमंचाचा वापर करताना दिसतात. उदा. वृंदावन दंडवते यांचे ' बूटपॉलिश ' ' राजाचा खेळ ' इत्यादी .

या कालखंडातील नाटकाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे सांगता येतील :-

_____ नाटकाविषयी नव्या जाणिवा व नवे प्रबोधन अधिक प्रमाणात होवू लागले.

_____ नाटकात प्रायोगिकता आली.

_____ भाषांतर रूपांतर द्वारा इतर भाषांतील नाटके जशी मराठीत आली तसे मराठीतील नाटक इतर भाषेत गेले .

_____ नाट्यविषयात विविधता आली.

_____ मनोविश्लेषणावर अधिक भर देण्यात आला.

यानंतर कवितेचा विचार करावयाचा.

कविता :- मराठी कवितेला एक नवे वळण मिळवून देणारे कवी या काळामध्ये निर्माण झाले. या काळामध्ये विंदा करंदीकर, वसंत बापट, मंगेश पाडगांवकर, दिलीप चित्रे, पु. शि. रेगे, सदानंद रेगे इत्यादी कवी मुख्यतः आढळतात.

१९६५ नंतर खऱ्या अर्थाने दलित कविता पुढे आलेली दिसते. या कवितांतून दलितांची अनेक दुःखे मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे. नकार - विद्रोहाची पूर्वनिश्चित भूमिका स्वीकारून वेदनापूर्व जीवनानुभव विचारप्रधान दृष्टिकोणातून दलित कवितेने मांडला आहे. दलित कविता जीवनानुभवाचे विविध पदर उकलून दाखविण्यापेक्षा पूर्वनिश्चित प्रतिक्रिया प्रकट करणे अधिक पसंत करते.

दलितांची अनेक दुःखे, वेदना, विद्रोह, त्यांच्यावर होणारे अन्याय या सर्व घटना दलित कवितेने मांडलेल्या आहेत. त्याम्हणजे मनुजवैरी समाजव्यवस्था, माणूसपणा नाकारणारी जातिव्यवस्था, दलितांना कमीपणा देणारी संस्कृती व परंपरा याविषयीचा संताप, कर्मविपाकासारखे सिध्दान्त या विषयीचा आपला विद्रोह या कवितेने प्रकट केला.

नामदेव ढसाळ यांनी आपल्या काव्यातून ही दुःखे अत्यंत रेखीवपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या 'गोलपिठा' (१९७२), 'तुही इयत्ता कंची'

( १९८१ ) या काव्यसंग्रहातून दलितांचे दुःख स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे केशव मेश्राम , यशवंत मनोहर , दया पवार , वामन निंबाळकर , अरुण कांबळे , प्रल्हाद चेंदवणकर , ज. वि. पवार , त्र्यंबक सपकाळे , या. ह. कल्याणकर , मीना गजभिये , अर्जुन डांगळे इत्यादी कवी दलित कविता समृध्द करीत आहेत.

विं.दा. करंदीकर यांनी अभंग, मुक्त सुनीते, सूक्ते, बालगीते, तालचित्रे, गझल असे विविध प्रकारचे काव्यलेखन समर्थपणे केले आहे. मानवी दुःखाचा समूळ वेध घेणारी, सखोल चिंतनशीलता , विविध प्रकारचे वैचारिक - सांस्कृतिक संदर्भ आणि जोमदार रांगडी अभिव्यक्ती ही करंदीकरांच्या कवितेची वैशिष्टये आहेत.

' स्वेदगंगा ' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह होय. यामधील कविता रसाळ , कल्पकतापूर्ण, ओजस्वी व जिवंत वाटतात. त्यांच्या काही कवितेत राष्ट्रीय कविता, छोटे - छोटे चुटकेही आहेत. ' माझ्या मना बन दगड ' ही त्यांची गाजलेली कविता. त्यांच्या कवितेत शेतकरी , कामकरी, दलित यांच्या दुःखद जीवनाची चित्रणे आहेत. 'स्वेदगंगा ' या त्यांच्या काव्यसंग्रहावर केशवसुत व माधव ज्यूलियन यांचा प्रभाव दिसतो. यानंतर 'मृदगंध ' , ' ध्रुपद ', 'जातक ', 'संहिता ' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. यंत्रयुगात मानवाला जे दुःख जी परात्मता सोसावी लागते त्याचे चित्रण त्यांच्या कवितेत आहे.

वसंत बापट यांच्या 'सेतू' या काव्यसंग्रहात प्रेमाचे विविध रंग दिसून येतात. लयतालांचे सूक्ष्म भान, संस्कृतसंपन्न शब्दक्रम, जातिवंत रसिकता व तिला साजेशी

प्रतिमासृष्टी इत्यादी गुण त्यांच्या कवितेत आढळतात. 'बिजली' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह. त्यानंतर 'सेतू', 'अकरावी दिशा', 'सकीना' इत्यादी त्यांचे काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत.

मंगेश पाडगावकरांच्या कवितेतून त्यांच्या हळव्या, निसर्गप्रेमी, व स्वच्छंदतावादी वृत्तीबरोबरच सामाजिक अन्यायाबाबतची चीड, सामाजिक दृष्टीकोन दिसून येतो. 'सलाम' (१९७८) मधील त्यांच्या कवितेतून ही चीड तीव्र उपरोधाचे रुप घेउन अवतरते.

दिलीप चित्रे यांची कविता म्हणजे त्यांच्या व्यक्तिगत अस्तित्वानुभवाचाच एक शोध आहे. त्यांनी सामाजिक दृष्टीकोन आपल्या अनेक कवितातून मांडलेला दिसून येतो. तसेच 'पुन्हा तुकाराम' यामधून तुकारामांच्या एकूण वाङ्मयावरही त्यांनी उत्कृष्ट समीक्षण केलेले दिसते. त्यांची एकूण कविता तळगाळातील लोकांची दुखे मांडते.

पु. शि. रेगे यांच्या कवितेचे नाते संस्कृतमधील गूढ शृंगारिक काव्यपरंपरेशी आहे. त्यांचे काव्यसंग्रह म्हणजे 'फुलोरा' 'हिमसेक', 'गंधरेखा', 'दुसरा पक्षी' इत्यादी.

कवि ग्रेस यांच्या कवितेतील नवता व आत्मपरता भावात्म नादलयींच्या अंगाने बहरत गेलेली आहे. त्यांचे 'संध्याकाळच्या कविता', 'राजपुत्र आणि डार्लिंग' 'चंद्रमाधवीचा प्रदेश' इत्यादी काव्यसंग्रह प्रसिध्द आहेत. तर अस्सल निसर्ग वर्णन

हे ना. धों. महानोरांच्या कवितेचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. ग . दि. माडगूळकरांचे ' गीत रामायण ' हे याच कालखंडातील आहे.

१९६३ - ६४ या काळात मराठी कवितेत चांगली रचना करणारा लेखक म्हणजे वा. वा. उर्फ भाऊसाहेब पाटणकर, यांनी शायरी काव्याचा दिलेला नजराणा उत्कृष्ट असा आहे. ' मराठी शायरी ', ' मराठी मुशायरा ' या त्यांच्या दोन काव्यसंग्रहांनी मराठीतील अगदी अनोख्या क्षेत्रात मोलाची कामगिरी केली आहे.

या कालखंडात ' मर्तिक ' ( चंद्रकांत खोत ), ' मेलडी ' , 'देखणी ' ( भालचंद्र नेमाडे ), गोंधी ' ( वसंत गुर्जर ), ' निरपराध ' ( चंद्रकांत पाटील ) , ' इंद्रियोपनिषद ' ,' विलंबित ' ( सतीश काळसेकर ) , ' अरुण कोल्हटकरांची कविता ' ( अरुण कोल्हटकर ) , ' येशभ्रष्ट ' ( वसंत आबाजी डहाके ) , ' आसवांचा ठेवा ' ( मधुकर केचे ) , ' ग्लोरिया ' ( गुरुनाथ धुरी ), ' कालस्वर ' ( शंकर वैद्य ) , 'माझे विद्यापीठ ' ( नारायण सुर्वे ) , ' मातीखालची माती ' ( आनंद यादव ) , ' रंग माझा वेगळा ' ( सुरेश भट ) हे महत्त्वाचे कवी लिहित होते. याच सुमारास आणखी काही कवितासंग्रह प्रसिध्द झालेले दिसतात. उदा. - ' रुपरेखा' ( गोविंद जोशी ), 'अनुबंध ' ( कृ. ब. निकुंब ) , ' पुन्हा कविता ' ( पाटील आणि मनोहर ), ' विझणवारा ' ( शां. रा. शिंदे ), 'कोरांटी' ( विष्णु देशपांडे ), ' आल्हाद' ( रा. लि. मैंदरकर ) इत्यादी . त्याचप्रमाणे ' आभाळवाटा ' (शंकर रामाणी), 'सांजवारा '(रा. म्हा.वाघमारे ), ' सागरवेल ' (विद्याधर भागवत), 'फूलमाळ '(सदाशिव माळी), 'झळई '(कृष्णा चौधरी ) इत्यादी काव्यसंग्रह

या काळात प्रसिध्द झालेले दिसून येतात. याच सुमारास सतीश काळसेकर, वसंत गुर्जर, मधू ताम्हणकर, रमेश पं. जोशी, जयंत नेरुरकर, वसंत आबाजी डहाके, अविनाश गोंडचोले, शांताराम पोवार, मनोहर ओक, चंद्रकांत पाटील , अनुराधा पाटील, इंद्रजित भालेराव , नारायण सुर्वे, नारायण कुलकर्णी कवठेकर अशी अनेक नवीन नावे दिसू लागली.

'आरती प्रभू' हे अगदी अलीकडचे एक समर्थ कवी म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांनी 'दिवेलागण' , 'नक्षत्रांचे देणे' , 'जोगवा' इत्यादी काव्यसंग्रहाने ते आणखी रसिकप्रिय बनले . कथा,कादंबरीकार , नाटककार म्हणून नाव कमावणाऱ्या या कवीने आपल्या वेदनांचे गाणेही तितक्याच हळूवारपणाने पण सामर्थ्याने गाईले आहे.

कवी अनिलांनी 'फुलवात' , 'सांगाती', 'दशपदी' या काव्यसंग्रहातून तर 'भग्नमूर्ती', 'निर्वासित चिनी मुलास' या खंडकाव्यातून मानवतावादाचा उद्घोष केला. मराठी कवितेला त्यांनी मुक्तछंदाची देणगी दिली.

या कालखंडातील काव्यलेखनाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे मांडता येतील.

___ या कालखंडातील कवितेचे भावविश्व अधिक व्यापक झाले.

___ या कवितेने परंपरेचा नव्याने शोध घेतला.

___ ती अधिक चिंतनपर तशीच वास्तववादी झाली.

या नंतर लघुनिबंध - ललितलेख याचा विचार करावयाचा आहे.

लघुनिबंध-ललितलेख:--

१९६० नंतर ललित निबंधामध्ये भरीव कामगिरी करणारे अनेक लेखक आहेत.

त्यामध्ये गो. वि. करंदीकर, न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळ, प्र. श्री. नेरुरकर , मधु मंगेश कर्णिक , श्री. वि. कुलकर्णी , मधुकर केचे, वि. द. घाटे, विजय तेंडुलकर, व्यंकटेश माडगूळकर , रमेश मंत्री, चिं. त्र्यं . खानोलकर, वसंत देशमुख, शिरीष पै इत्यादींचा उल्लेख करावा लागेल.

' परिपूर्ती ' (१९४९), 'भोवरा ' (१९६०) , 'गंगाजल ' (१९७२) या संग्रहातून इरावती कर्वे यांचेही असेच नव्या जाणिवेचे ललितनिबंध दिसतात. त्यांचा व्यासंग, त्यांचे भ्रमण , त्यांना लाभलेले संवेदनाप्रधान मन यांचा प्रभाव त्यांच्या ललित-लेखनावर पडला असल्यास नवल नाही.

पशु, पक्षी, झाडे, डोंगर, नद्या, मानवी हाडे, कवट्या यांच्याप्रमाणेच कुटुंबातील पती, दीर, मामंजी यांचाही गोतावळा त्यांच्याभोंवती होता. स्वतःच्या अभ्यासातील चिंतनाचे विषय, स्वतःची सुख-दुःखे त्या कोठल्याही प्रकारचे बाह्य कृत्रिम बंधन न मानता व्यक्त करतात.

दुर्गा भागवतांनी लघुनिबंधाची तांत्रिक चौकट न वापरता सौंदर्यपूर्ण व चिंतनात्मक स्वैर गद्य- लेखन केले. 'ऋतुचक्र ' (१९५६ ), 'भावमुद्रा ' ( १९६०) , 'व्यासपर्व ' (१९६२) , 'पैस ' (१९७०), ' दूब '( १९७५) या संग्रहातून त्यांचे स्फुट ललित गद्यलेख वाचायला मिळतात. भाववृत्तीत डुबून त्यांनी निसर्गाची विविध रुपे न्याहाळली आहेत. पिंपळाची कोंवळी पालवी, चाभळीचा पिवळा फुलोरा, पांदऱ्या ढगांचे थवे,

A
13615

काळ्या ढगामागचे सोनेरी ऊन , नक्षत्रांचे तेज, बलाकपक्षांच्या माळा, अशा अनेक निसर्गसौंदर्याचा आत्मा त्या शोधीत राहिल्या.

गो. वि. करंदीकरांचे ' स्पर्शाची पालवी ' ( १९५८ ) , ' आकाशाचा अर्थ ' ( १९६५) हे लघुनिबंध संग्रह प्रसिध्द आहेत. त्यांची चिंतनशीलता, त्यांचे कोकणप्रेम, त्यांच्या बालपणात रमणारी , गुह्यगुंजनात हरवण्याची वृत्ती यांचे दर्शन त्यांच्या ललित निबंधांतून घडते.

न. वि. उर्फ काकासाहेब गाडगीळांनी मुक्तपणाने, स्वैरपणाने ललितलेखन केले आहे. ' साल गुदस्त ' व ' अनगड मोती ' (१९५५ ), ' पाव आणि मिसळ ' (१९६३) , ' चॉकलेटची वडी ' ( १९६७), ' देवाचिया द्वारी ' (१९६८) इत्यादी लेखनाचा यात समावेश होतो.

प्र. श्री. नेरुरकरांचे ' अनवाणी वाळ ' व ' माझ्या आजोळाची वाट ' हे ललितमधुर स्वैर लेखांचे संग्रह प्रसिध्द आहेत. मधु मंगेश कर्णिक - ' सोबत ' (१९६२), श्री. वि. कुलकर्णी - 'डोह' (१९६५) , मधुकर केचे - ' आखर आंगण ' ( १९६७) इत्यादी संग्रहात आठवणी आहेत, कथा आहेत, स्वैर प्रकट चिंतन आहे, निसर्गाशी हितगुज आहे. श्री. वि कुलकर्णी यांचा ' सोन्याचा पिंपळ ' (१९७१) म्हणजे याच जातीच्या लेखांचा संग्रह आहे. अनेक अनुभवांची स्वैर स्मरणचित्रे , वा. रा. सोनार यांच्या ' मरव्यगान ' (१९७२) मध्ये आहेत. तर कलात्मक प्रतिमांत गुंतलेले कविमन ग्रेस यांच्या ' चर्चबेल ' (१९७४) मध्ये प्रकट होताना दिसते. ' उन्हातली आई

', 'गुलमोहर', 'पल्लवीचे पक्षी',' संध्याकाळचा फकीर', 'वाहुल्यांचा मृत्यू', ' हात' असे काही ग्रेस यांचे ललित लेख वाचनीय आहेत.

अलीकडे वृत्तपत्रांतून विशेषतः नियतकालिकांच्या रविवारच्या आवृत्तीतून असेच काही स्वैर लेखन केले जाते. त्यातील निवडक लेखांचे संग्रह वाचनीय ठरतात. 'वाटेल ते' - ल. ना. गोखले (१९४६), 'कोवळी उन्हे' व ' रातराणी' - विजय तेंडुलकर (१९७१)', 'स्वल्पविराम' - रमेश मंत्री (१९७१), ' वारा वाजे रुणझुणा' - चिं. त्र्यं. खानोलकर (१९७३), 'वेध' - अनिल अवचट ( १९७४), 'आजचा दिवस' - शिरीष पै ( १९७४), 'रोजनिशीची पाने' - मा. पं. शिखरे ( १९७४) अशा संग्रहाची नावे सांगता येण्यासारखी आहेत.

इरावती कर्वे - स्वातंत्र्योत्तर काळातील नव्या लघुनिबंधाच्या संदर्भात इरावती कर्वे यांच्या प्रयत्नांना अनन्यसाधारण महत्व आहे. जुन्यातून यशस्वीपणे बाहेर पडणे व नवे यशस्वीपणे आत्मसात करणे असे दुहेरी यश त्यांना लाभले. ही धडपड त्यांनी एकाकीपणे केली आहे. नव्या लघुनिबंधाच्या उगमापाशी त्या उभ्या आहेत असे वाटते. त्यांचे 'परिपूर्ती', 'भोवरा' (१९६०), 'गंगाजळ' ( १९७२) , हे तीन लघुनिबंधसंग्रह आहेत. त्यामध्ये ललित गद्याच्या इतर प्रकारांचे लेखनही आहे.

प्रत्यक्ष जीवनातील विविध अनुभवांचे चिंतन व त्या चिंतनाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष अनुभव जसे रूप घेईल तसे त्यांचे आविष्करण, अशीच त्यांची भूमिका असावी असे त्यांच्या तीन पुस्तकातील एकूण लेखनावरून वाटते.

ललित निबंधाविषयी काही निरीक्षणे मांडता येतील. :--

___ लघुनिबंधाकडून ललित निबंधाकडे व ललित लेखाकडे या लेखनाचा प्रवास झालेला आहे.

___ काव्यात्मता, चिंतनात्मकता ही वैशिष्ट्ये या लेखनांस लाभली आहेत.

___ लेखकाचा जीवनविषयक दृष्टिकोन, सूक्ष्म निरीक्षण, व्यासंग यांचे मनोहारी प्रतिबिंब लघुनिबंधात उमटते.

यानंतर चरित्राचा विचार करावयाचा आहे.

<u>चरित्र :-</u>

चरित्र या वाङ्मय प्रकारात साठोत्तरी काळात महत्वाची भर पडली. चरित्रामध्ये विविध क्षेत्रातील व्यक्तींची चरित्रे लिहिली गेली. त्यात 'छत्रपती संभाजी महाराज' - वा. सी. बेंद्रे; 'नाट्याचार्य देवल' - श्री. ना. बनहट्टी; 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज' - मधुकर केचे; 'श्री गोविंदप्रभू चरित्र' - वि. भि. कोलते; 'मृत्युचे चुंबन घेणारा महाकवी' - साने गुरुजी - प्र. के. अत्रे; 'राम गणेश गडकरी' - माधव गडकरी; 'बाळ गंगाधर टिळक' - गोविंद तळवलकर; 'विनोबा भावे' - यदुनाथ थत्ते; 'प्रतापी बाजीराव' - म. श्री. दिक्षित; 'टॉलस्टॉय : एक माणूस' - सुमती देवस्थळे; 'शिवचरित्र, एक अभ्यास' - सेतु माधवराव पगडी; 'र. धों. कर्वे' - य. दि. फडके; 'पप्पा' - शिरीष पै; 'सुलोचना' - वसंत भालेकर; 'कर्मवीर शिंदे यांचे जीवनकार्य' - मा. पं. मंगुडकर;

नेताजी ' - वि. स. वाळिंबे ; ' राजर्षि शाहू : राजा माणूस ' - कृ. गो. सूर्यवंशी ; ' कहाणी लंडनच्या आजीबाईची ' - सरोजिनी वैद्य या महत्वाच्या चरित्रग्रंथांचा समावेश होतो.

आ ) - आत्मचरित्र :---

" लेखकाने आपल्या व्यक्तीगत जीवनाची स्वतःच्या शब्दात सांगितलेली कहाणी म्हणजे आत्मचरित्र होय ." अशी आत्मचरित्राची व्याख्या केली जाते.

१९६० नंतर आत्मचरित्रे स्वतःच्या जीवनाचा वृत्तांत सांगतानाच समाजाचेही चित्रण करतात. काही आत्मचरित्रे आजही वाचनीय आहेत. उदा. - अ. वा. सहस्त्रबुध्दे ' माझी घडण ' ( १९६१); पां. चि. पाटील ' माझ्या आठवणी ' ( १९६४); गंगाधरराव देशपांडे ' माझी जीवनकहाणी ' ( १९६० ) ; र. पु. परांजपे यांचे ' नाबाद ८९ ' ( १९६५ ) ; ना. भि. परुळेकर ' निरोप घेता ' (१९७५) ; वि. स. माडीवाले ' अशी ही विकट वाट ' ( १९७२) ; केशव ठाकरे ' माझी जीवनगाथा ' ( १९७३) या आत्मचरित्रात स्वतःच्या जीवनात आलेल्या अडचणी ,त्यास दिलेले तोंड , आपली ध्येये , आपली मूल्ये प्रणपणाने जपण्याची , वृत्ती इत्यादी वैशिष्टये दिसून येतात. तसेच स्वतःच्या पुरुषार्थी , आक्रमक जीवनदृष्टीचा शैलीदार लेखणीद्वारे पुनःपुन्हा , उच्चार करतात. ' आप्पासाहेब पंत एक प्रवास एक शोध ' (१९७५) मध्ये स्वतःची कर्तृत्वक्षेत्रे न्याहाळत अत्याधुनिक जीवनाचा विचार करताना आढळतात. डॉ. सुधीर फडके यांनी ' कोठे आणि कधीतरी ' ( १९७२ ) मध्ये स्वतःचे आणि तळागाळाच्या समाजजीवनातील अनुभव मांडलेले दिसून येतात.

आजच्या लोकांवर आत्मचरित्राचे सुसंस्कार व्हावेत. या प्रयोजनाने काही लेखकांनी आत्मचरित्रे लिहिली आहेत. त्यामध्ये वा. म. पटवर्धन - ' विरंगुळा ' (१९६०); श्री. म. माटे - ' चित्रपट '(१९६० );कृ. पो. कुलकर्णी -' कृष्णाकाठची माती ' ( १९६१) ; वा. गो. मायदेव - ' वेचलेले क्षण ' ( १९६५ ) ; कृ. भा . बावर - ' एका शिक्षकाची कथा ' ( १९६२) ; ना. वि. पाटणकर - ' समाधान ' ( १९६२) ; के. ना. वाटवे - ' माझी वाटचाल ' (१९६४) इत्यादी आत्मचरित्रे आजही प्रसिध्द आहेत.

वरील सर्व आत्मचरित्राहून वेगळे आत्मचरित्र म्हणजे नारायण महाडिकांचे " कैदी नंबर ३१४६७ " ( १९७४) होय. या आत्मचरित्रात खुनाच्या आरोपावरून जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्याचे कैदेतील आणि तुरुंगाबाहेरील अनुभवांचे विदारक चित्रण आहे. अशा प्रकारे आत्मचरित्रांची अनुभवकक्षा रुंद होणे हे प्रगतीचे एक लक्षणच मानावे लागेल.

डॉ. अरुण लिमये हे डॉक्टरी व्यवसायातील वेगळ्या अनुभवांची अत्यंत व्यवस्थित नोंद इतर साहित्यिकाप्रमाणे प्रत्ययकारी शैलीत करताना दिसतात. त्याचप्रमाणे सेतू माधवराव पगडींच्या 'जीवनसेतू ' ( १९६९) या आत्मचरित्रामध्ये व्यासंगाची व जीवनातील चमत्कृतिपूर्ण अनुभवांची हकिगत वाचावयास मिळते. तसेच ' स्त्री - किर्लोस्कर ' मासिकाचे ध्येयवादी संपादक श. वा. किर्लोस्कर यांचे ' शंवाकीय ' ( १९७४) हे आत्मचरित्र त्यांच्या ' उद्योग - उत्साह - आत्मोन्नती ' या सूत्रावर आधारलेल्या संपादकीय कारकीर्दीची व प्रसन्न वृत्तीची ओळख करुन देते. प्रसिध्द

कादंबरीकार गो. नी. दांडेकरांच्या कलंदर जीवनाची व लेखकाला अनुभव समृध्द करणाऱ्या भटकंतीची माहिती ' स्मरणगाथेत ' (१९७३) मिळते. तर श्री . ना. पेंडसे स्वतःचा शोध त्रयस्थपणे घेण्यासाठी स्वतःच्या मित्राची भूमिका ' लेखक आणि माणूस ' ( १९७०) मध्ये घेते. तर पु. मा. भावे यांच्या ' प्रथमपुरुषी एकवचनी ' ( २ भाग , १९८० - १९८३ ) या आत्मचरित्रामध्ये हिंदुत्वनिष्ठ राजकारण , वृत्तपत्रीय संघर्ष आणि साहित्य क्षेत्रातील वाद - वादंग यांच्या हकिगती व त्यासंबंधातील चिंतन मिळते.

त्याचप्रमाणे बाबुराव पेंढारकर - ' चित्र आणि चरित्र ' ( १९६१ ), नानासाहेब फाटक - ' मुखवटयांचे जग ' ( १९६३), श. नी. चाफेकर - ' स्मृतिधन ' (१९६६) , गजानन जाहगिरदार - ' संध्याकाळ ' (१९७१) इत्यादी आत्मचरित्रे प्रसिध्द आहेत. तर रामनगरकर यांचे ' रामनगरी ' ( १९७५), ' तराळ- अंतराळ '- शंकरराव खरात ( १९८१) या आत्मचरित्रातून स्वतःच्या कौटुंबिक व कलाक्षेत्रातील सर्वसामान्य अनुभवाकडे मागे वळून पाहताना त्यांना अनेक चांगले- वाईट आलेले अनुभव आत्मचरित्रातून मांडलेले आहेत. या आत्मचरित्रामुळे त्यांना यश मिळाले आहे.

**स्त्री- आत्मचरित्रकार : --**

पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही आत्मचरित्र लिहण्याचा प्रयत्न केलेला आहे. या मध्ये आनंदीबाई शिर्के यांचे 'सांजवात ' ( १९७२ ) हे आत्मचरित्र साठ-सत्तर वर्षापूर्वीच्या मराठी समाजाचे दर्शन स्वतःच्या सोज्वळ, खानदानी वृत्तीतून व्यक्त होते. तर डॉ.

केतकरांच्या पत्नी शीलावतीबाई केतकर यांनी ' मी हेच सांगितले पाहिजे ' ( १९६९) हे आत्मचरित्र केतकरांच्या चरित्रकारांचा परामर्श घेते. तसेच स्वतःचे असामान्य सांसारिक जीवन खुले करण्याचा प्रयत्न केला आहे. सरोजिनी वैद्यांनी संपादित केलेल्या ' श्रीमती काशीबाई कानिटकर आत्मचरित्र आणि चरित्र ' ( १९८० ) या आत्मचरित्रामध्ये अपूर्ण आत्मचरित्राला पूर्णता देण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे.

त्याचप्रमाणे हंसा वाडकर यांचे ' सांगत्ये ऐका ' ( १९७०) हे आत्मचरित्र फार गाजले. यानंतर लीला चिटणीसांच्या' चंदेरी दुनियेत ' ( १९८१) या आणि दुर्गा खोटे यांच्या ' मी दुर्गा खोटे ' ( १९८२ ) या आत्मचरित्रांनी भारतीय चित्रपट सृष्टीचीही ओळख करुन दिली आहे.

१९६० - ६५ पासून दलितांच्या आत्मकथांनी समाजामध्ये मोठे स्थान मिळविलेले आहे. याबद्दल प्रा. रमेशचंद्र पाटकर म्हणतात " ती वाङ्मयकक्षा अधिकच विस्तृत केली आहे. मध्यमवर्गीय जीवनातील अनुभवविश्व इंग्रजी आमदनीतील शिक्षण प्रसारामुळे साहित्यात जेवढ्या सहजतेने प्रकट होत आले तेवढ्या सहजतेनेच डॉ . आंबेडकरांनी उभ्या केलेल्या दलित चळवळीतून दलित साहित्यही जन्मालाही आलेले आहे. हे साहित्य प्राधान्याने आत्मपर अनुभवाशीच बांधलेले असून कधी कथा - कादंबऱ्यांच्या रुपानेच अधिक सकसपणे प्रगटलेले आहे. " असे त्यांनी आत्मचरित्राबद्दल आपले मत मांडले आहे.

१९७८ ते आजपर्यंत गाजलेली अनेक आत्मचरित्रे आपल्याला सांगता येतील.

ती म्हणजे 'चलूर्त' दया पवार (१९७८); 'आठवणींचे पक्षी'- प्र. ई. सोनकांबळे (१९७९); 'उपरा' लक्ष्मण माने; 'उचल्या' - लक्ष्मण गायकवाड; 'आभरान' पार्थ पोळके इत्यादी आत्मकथा एकेका व्यक्ती इतक्याच त्या - त्या समाजाचे जीवनही कधी निर्लेप मनाने तर कधी विद्रोहाच्या, अन्यायाच्या भावनेने पेटून प्रगट करतात. त्यांची भाषाही अनेकदा ज्या वर्गाचे, जातीचे जीवन आत्मकथेत येते. खऱ्याअर्थाने ती त्यांचीच भाषा असते. थोडक्यात, आत्मचरित्राची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

— सर्वच आत्मचरित्रे स्वतःच्या जीवनाचा वृत्तांत सांगतानाच समाजाचेही चित्रण ती करतात.

— आजच्या लोकांवर सुसंस्कार व्हावेत म्हणूनच आत्मचरित्रे निर्माण झाली.

— आत्मचरित्रातून सुख - दुःखांचा विचार केला जातो.

— आत्मचरित्रातून दलितांचे भावविश्व आविष्कृत झाले.

— स्त्री आत्मचरित्रामुळे स्त्रियांच्या दुःखाला वाचा फुटली.

— या कालखंडात कलावंत, पत्रकार, उद्योगपती आदींची आत्मचरित्रे लिहिली गेली.

अशारीतीने आत्मचरित्रकार मग ते मध्यमवर्गीय असोत वा दलित स्त्रिया असोत वा पुरुष यामध्ये विविध क्षेत्रातील अनुभवसंपन्न निवेदने आहेत. एखाद्या कालखंडातील महत्वाच्या घटनेचा अनेकांच्या आयुष्याशी संबंध आला असेल; तर त्या - त्या घटनांचे विविधांगी पडसादही उमटताना दिसतात.

प्रत्येकांची निवेदनशैली, लेखन तंत्र वेगवेगळे असतील. आज मध्यम वर्गीयांच्या आत्मचरित्रांप्रमाणेच दलितांच्या वा ग्रामीण लेखकांच्या आत्मचरित्रावर व विशेषतः स्त्रियांच्या आत्मचरित्रांवर बऱ्याच मर्यादा आलेल्या दिसतात. त्यांना जे सांगावयाचे आहे, अशी खूणगाठ या लेखिका मनात बांधतात. पण प्रत्यक्षात त्या सांगू शकत नाहीत. आजही समाज, रुढी इत्यादींची बंधने त्यांना स्वत्व प्रकाशात आणण्यापासून वंचित ठेवतात. कोणत्याही आत्मचरित्रांतून समाजाचे प्रतिबिंब दिसते. एका व्यक्तीच्या आत्मचरित्रांतुन समाजाची अनेक रुपे दिसून येतात.

यानंतर प्रवासवर्णनांचा विचार करावयाचा आहे.

**प्रवासवर्णने :-**

प्रारंभीच्या काळात गोडसे भटजी व अनंत काणेकर, श्री. रा. टिकेकर यांनी प्रवासवर्णने लिहिली. प्रवासामधल्या गमती-जमती, सुख - दुःखाचे अनुभव, अनेक लोकांचे आचार - विचार, त्यांच्या मनातील चांगल्या - वाईट वृत्ती रेखाटणे हे अनेक लेखकांनी साहित्याच्या माध्यमातुन रेखाटले आहे. पूर्वीच्या काळी लेखकांना विविध देशांचा प्रवास करावा, त्यांतील अनुभवांचे सार लिहून ठेवावेत ही वृत्ती लेखकांच्याकडे तशी कमीच होती. १९६० पूर्वी फार कमी प्रमाणात प्रवासवर्णने लिहिली आहेत. पण १९६० नंतर याची संख्या खूप वाढलेली दिसते. यामध्ये अनेक लेखकांचा विचार करावा लागेल.

अनंत काणेकर :— आधुनिक काळामध्ये प्रवासवर्णने लिहिणारे पहिले

लेखक म्हणून काणेकर यांचे नांव घेता येईल. त्यांची प्रवासवर्णने म्हणजे, ' धुक्यातून लाल ताऱ्याकडे ' - या प्रवासवर्णनातून त्यांनी युरोप, रशियाच्या प्रवासामुळे काणेकरांची काव्यात्मकता, त्यांची निरीक्षण शक्ती, त्यांची आवड - निवड, त्यांची अभिजात कलाशक्ती यांच्या सुंदर रसायनाने हे प्रवासवृत्त खुलत जाते. तसेच ' आमची माती आमचे आकाश ' व ' निळे डोंगर तांबडी माती ' या दोन्ही प्रवासवर्णनात त्यांनी चित्रकार, दलाल यांच्याबरोबर केलेला प्रवास त्यांनी वरील प्रवासवर्णनातून रेखाटला आहे. त्याचप्रमाणे त्यांचे अलिकडचे प्रवासवर्णन म्हणजे ' खडक कोरतात आकाश ' आणि १९६९ मध्ये प्रसिध्द झालेले प्रवासवर्णन म्हणजे ' गुलाबी प्रकाशात बोलक्या लेखण्या ' होय.

श्री. रा. टिकेकर :-- काणेकरांच्या नंतर उत्कृष्ट प्रवासवर्णने लिहिणारे लेखक म्हणजे टिकेकर होय. त्यांनी ' मुसलमानी मुलुखातील मुशाफरी ' व ' नर्मदेच्या तटाकी ' ही प्रवासवर्णने लिहिली आहेत. समाजातील अस्सल चित्रण या प्रवासवर्णनातून स्पष्ट होते.

अलीकडच्या काळात अनेक लेखकांनी प्रवासवर्णने लिहिली आहेत. यामध्ये रा. भि. जोशी यांचे ' वाटचाल ' व ' मजल दर मजल ' तसेच गंगाधर गाडगीळांचे ' गोपुरांच्या प्रदेशात ', ' सातासमुद्रापलीकडे ' व प्रभाकर पाध्ये यांचे ' तोक्योनामा ' व ' अगस्तीच्या अंगणात ' इत्यादी दर्जेदार प्रवासवर्णने येतात. याचबरोबर अरविंद गोखले, ग. त्र्यं. माडखोलकर, प्र. न. जोशी, यमुनाबाई

शेवडे , जोत्स्नाबाई भोळे, ब्रा. भ. कर्णिक , वि. स. वाळिंबे , द. वा. पोतदार , वसंत पाटणकर , द. वि. नवाथे इत्यादी लेखकांनी आपापल्या परदेश दौऱ्यासंबंधी लेखन केलेले आहे.

१९७० नंतर काही प्रवासवर्णने प्रसिध्द झालेली आहेत. यामध्ये कमला फडके यांचे ' उटकमंडची यात्रा ' ; वसंत अवसरे यांचे ' लाल नदी निळे डोंगर ' ; काशिनाथ पोतदार यांचे ' हसरे खोरे ' ; चारुशीला गुप्ते यांचे ' बर्फाच्या दुनियेत ' ; दि. बा. मोकाशी यांचे ' अठरा लक्ष पावले ' अशी काही निवडक पण महत्त्वाची प्रवासवर्णने प्रसिध्द आहेत.

सर्वात लोकप्रिय ठरलेले प्रवासवृत्त लेखक म्हणजे पु. ल. देशपांडे होय. त्यांचे चौफेर निरीक्षण , विविध कलांत त्यांना असणारा रस , माणसांतील नाती जोडण्याचे त्यांचे कौशल्य आणि जीवनाकडे पाहण्याची एक निकोप व रसिकवृत्ती या सर्वांची छाप त्यांच्या प्रवासवृत्तांवर पडते. त्यामुळे त्यांची प्रवासवर्णने आजही वाचक तितक्याच आनंदाने वाचत राहतो. ' अपूर्वाई ' , ' पूर्वरंग ' ही त्यांची प्रवासवर्णने प्रसिध्द आहेत.

अगदी अलीकडच्या काळात आणखी काही चांगली प्रवासवर्णने वाचावयास मिळतात. यामध्ये मीना देशपांडे यांचे ' पश्चिमगंधा ' या प्रवासवर्णनामध्ये युरोपच्या प्रवासातील अनुभव सांगितले आहेत. तर मेघा काळे यांनी उत्तर हिंदुस्थानच्या प्रवासातील काही रम्य आठवणी ' शालिमारची साद ' या प्रवासवर्णनातून

सांगितल्या आहेत. त्याचप्रमाणे बाबा भांड यांचे ' लागेबांधे ', रमेश मंत्री यांचे ' सुखाचे दिवस ' इत्यादी प्रवासवर्णने प्रसिध्द आहेत. वरील सर्व प्रवासवर्णनामध्ये रवींद्र पिंगे यांचे ' आनंदाच्या दाही दिशा ' हे प्रवासवृत्त भारतीय माणसाचे, त्यांच्या अज्ञानाचे , त्यांच्या दुरावस्थेचे दर्शन घडवणारे आहे. त्यांचा हा आलेख वाचकांच्या मनांत अनेक ऊर्मी उठविण्यास समर्थ असाच आहे. तसेच या प्रवास वर्णनानंतर दिलीप चित्रे यांचा ' शीबा राणीच्या शोधात ' हा असाच एक लक्षणीय प्रवासवृत्तांत आहे.

तर अरविंद गोखले यांचे ' अमेरिकेस पाहवे जाऊन ', वसंत बापट यांचे ' बारा गावचे पाणी ', मधुकर केंचे यांचे ' एक भटकंती ' , माधव गडकरी यांचे ' मुंबई ते मास्को ', इंदू साक्रीकरांचे ' पूर्वेच्या परिसरात ', रवींद्र केळकरांचे ' जपान असा दिसला ' इत्यादी प्रवासवर्णने त्या - त्या लेखक लेखिकेच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविणारी आहेत. व ही सर्व प्रवासवर्णने स्वतःचे वेगळेपण दाखविणारी आहेत.

या प्रवासवर्णनाची काही वैशिष्ट्ये अशी सांगता येतील.

— प्रवासवर्णनातून सुख - दुःख , लोकांचे आचार - विचार , त्यांचे राहणीमान, दर्जा , गंमती - जंमती , चांगल्या - वाईट वृत्ती इत्यादी वैशिष्ट्ये पाहवयास मिळतात.

— प्रवासवर्णनातून समाजाचे प्रतिबिंब पाहवयास मिळतात.

___ प्रवासातून माणसा - माणसातील नाती जोडली आहेत.

यानंतर व्यक्तिचित्रांचा विचार करावयाचा आहे.

व्यक्तिचित्रे - शब्दचित्रे : -

एखाद्या श्रेष्ट व्यक्तीचे सरळ, साधे, कालमानानुसार चरित्र लिहिणे निराळे पण त्याचे ललित रम्य भाष्य, मोजक्या शब्दांत चित्र रेखाटणे निराळे, शब्दचित्रे वा व्यक्तीचित्रे अथवा गुणग्राही परिचय यांना आजकाल ललित वाड्.मयात महत्वाचे स्थान आहे.

अलीकडे विविध नात्यागोत्यांतील परिचित, कलावंत, समाजसुधारक, सत्पुरुष वा एखादा साधा रस्त्यावरील माणूस इत्यादींची सुंदर शब्दचित्रे मराठीत दिसतात. शब्दचित्रे, व्यक्तिचित्रे, स्वभावचित्रे हा गद्य ललित प्रकार अलीकडील काळातही लोकप्रिय ठरलेला दिसतो. एखाद्या थोर पुरुषाच्या मृत्यूनंतर लिहिलेला मृत्युलेख हा अव्वल दर्जाचा ललित लेख ठरण्याचा संभव आहे.

वसंत शांताराम देसाई - यांच्या ' रागरंग ' ( १९६० ) या प्रवासवर्णनात अल्लादियाखाँ, भास्करबुवा बखले, केशवराव भोसले, बाबुराव पेंटर, व्ही. शांताराम, सवाई गंधर्व, हिराबाई बडोदेकर, केशवराव दाते, विनायकबुवा पटवर्धन, दिनकर कामण्णा, गोविंदराव टेंबे, फैयाजखाँ, इत्यादी कलावंताचा परिचय लेखकाने करुन दिला आहे. मधुकर केचे यांनी 'वेगळे कुटुंब ' ( १९६५ ) या पुस्तकातून गाडगेबाबा, आडकोजी महाराज, कोसंबी, सुरेश भट, कुसुमावती देशपांडे व माय इत्यादी

अतिशय वेधक अशी व्यक्तीचित्रे रेखाटली आहेत.

म. श्री. दीक्षित यांनी ' साहित्यिकांच्या सहवासात ' ( १९६३ ) या पुस्तकात यशवंत, अनिल, माधव ज्युलियन , श्री. म. माटे, 'भाला' कार भोपटकर, कृष्णराव मराठे , निरंतर आणि करंदीकर ( ज. स. ) दत्तो वामन , काकासाहेब गाडगीळ , शं. दा. पेंडसे, इत्यादी साहित्यिकांचा संक्षेपाने त्यांच्या गुणवैशिष्ट्यासह परिचय करुन दिला आहे.

काकासाहेब गाडगीळ ' माझे समकालीन ' मध्ये आपल्या सहकाऱ्यांचा परिचय करुन देतात. तर ' काही मोहरा , काही मोती ' या पुस्तकात ते लाला लजपतराय, श्रीनिवास शास्त्री, गंगाधरराव देशपांडे , पुरुषोत्तमदास टंडन, सुभाषचंद्र बोस , डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादींचा त्यांच्या कार्यासह सुबोध परिचय आपल्या व्यक्तिगत संबंधातून करुन देतात.

अरविंद ताटके यांनी ' संशोधक सप्तर्षि ' मध्ये का. ना. साने , वासुदेव शास्त्री खरे, वि. का. राजवाडे , रियासतकार देसाई , यदुनाथ सरकार, वि. ल. भावे इत्यादी संशोधकाचा परिचय करुन दिला आहे.

माधवराव बागल यांनी ' बहुजन समाजाचे शिल्पकार ' यामध्ये महात्मा फुले , राजर्षि शाहू महाराज , खंडेराव बागल , भास्करराव जाधव , अण्णासाहेब लठ्ठे , श्रीपतराव शिंदे , दासराम , दे. भ. जवळकर , केशवराव जेधे , भाऊराव पाटील , वि. रा. शिंदे , भाऊसाहेब हिरे , डॉ. आंबेडकर , केशवराव विचारे , शामराव देसाई ,

मुकुंदराव पाटील , पंजाबराव देशमुख , शंकरराव मोरे , नाना पाटील इत्यादींचे चटकदार भाषेत व्यक्तिचित्रणात्मक परिचय करून देऊन या श्रेष्ठ पुरुषांचे कार्य अनेक वाचकांपुढे उभे केले आहे.

ग. त्र्यं. माडखोलकर यांनी 'व्यक्तिरेखा' ( १९६६ ) या संग्रहात राजकारण , पत्रकारिता , साहित्य या क्षेत्रात काम करताना त्यांचा जो विविध व्यक्तींशी संबंध आला त्यांचे चित्रण केले आहे. तर काहींच्या आठवणी , काहींचे वाढदिवस , समारंभ व काहींचे मृत्यूलेख इत्यादींचा समावेश त्यांच्या वरील पुस्तकात समाविष्ट झालेला आहे. डॉ. खरे , डॉ. राघवेंद्रराव , झगलूल पाशा , दयानंद सरस्वती , प्रॉ . के. कर्वे, गो. कृ. देवधर , शेठ जमनालाल बजाज , न्या. महादेव गोविंद रानडे , बालगंधर्व , काकासाहेब खाडिलकर , केशवराव दाते , पु. रा. लेले , गणपतराव बोडस , दादा धर्माधिकारी , श्री. अ. डांगे , वि. सी. गुर्जर , उमाकांत भेंडे , हिराबाई पेडणेकर इत्यादींची रेखीव व समर्पक व्यक्तिचित्रे माडखोलकर यांनी रंगविली आहेत.

अ. ह. लिमये :- यांनी 'सत्याद्रींची शिखरे' खंड १ व २ ' ( १९६३ - ६७ ) मध्ये अप्पासाहेब परांजपे , द . वा. पोतदार , ग. रा. भटकळ , महादेव शास्त्री जोशी , वि. द. घाटे , भीमसेन जोशी , आबासाहेब मुजुमदार , बाबुराव जगताप ,रा.ना दांडेकर इत्यादी परिचितांची सहृदयतेने व्यक्तिचित्रे रेखाटलेली आहेत.

मराठीमध्ये अलीकडे लोकप्रिय होत चाललेल्या या व्यक्तिचित्रात्मक ललित वाङ्मयप्रकाराची आणखी काही उदाहरणे देता येतील. यामध्ये पु. ल. देशपांडे ,

' व्यक्ती आणि वल्ली ' ( १९६२ ) , ' गणगोत ' ( १९६६ ) , 'गुण गाईन आवडी ' ( १९७५ ) ; वसुंधरा पटवर्धन ' ऋणानुबंध ' ( १९७० ) ; प्रभाकर पाध्ये ' व्यक्तिवेध ' ( १९७३ ) ; टिळक ' मन केवढं केवढं ' ( १९७३ ) ; रवींद्र पिंगे ' देवाघरचा पाऊस ' ( १९७४ ) ; कृ. द. पंडित ' सहवास ' ( १९७५ ) ; उद्धव शेळके ' कडूलिंबाची सावली ' (१९७५) ; विद्याधर पुंडलिक ' आवडलेली माणसे ' ( १९७६ ) इत्यादींचा समावेश होतो.

या व्यक्तीचित्रणांची काही वैशिष्ट्ये सांगता येतील .

— व्यक्तिचित्रणातून अनेक व्यक्तींचा परिचय होतो.

— या व्यक्तिचित्रातून व्यक्तीचे मन व त्याची वर्णनवैशिष्ट्ये कलात्मतेने आविष्कृत होतात.

— कलावंत हा सामान्य माणूसच असतो याचेही दर्शन या व्यक्तिचित्रणांतून होते.

विनोदी वाड.मय : --

पु. ल. देशपांडे :- हे आधुनिक काळातील एक प्रभावी व्यक्तिमत्व आहे. पु. ल. यांचे विनोद हे हसता - हसता विचार करावयाला लावतात. माणसा माणसांतील नाती कशी आकार घेतात हे विनोदाच्या शैलीतून ते सांगतात. त्यांची काही विनोदी लेख सांगता येतील . ' खोगीरभरती ' , ' नस्ती उठाठेव ' , ' हसवणूक ' , ' बटाट्याची चाळ ' , ' असा मी असामी ' , ' गोळाबेरीज ' , ' वाऱ्यावरची वरात ' या वाड्.मयाचा त्यात समावेश होतो. जयवंत दळवी यांच्या काही विनोदी साहित्यकृती प्रसिध्द आहेत. ' सारे प्रवासी घडीचे ' ( १९६४ ), ' कशासाठी

प्रेमासाठी ' ( १९६५ ) , ' निवडक ठणठणकाळ ' ( १९६५ ) , इत्यादी लेखांनी कमालीची प्रसिध्दी मिळविली आहे.

लघुकथा या साहित्यप्रकारात कोटी , उपहास व केवळ विनोद या तीनही प्रकारचा उत्तम विनोद ग्रामीण कथेत द. मा. मिरासदार व शंकर पाटील यांनी प्रकट केला आहे. मिरासदारांनी ' माझ्या बापाची पेंड ' या कथामध्ये स्थानांतर हे तंत्र वैशिष्टय वापरुन विक्षिप्ताच्या धर्तीचा कोटीरुप विनोद , हास्यरुप विनोद , चांगल्या प्रतीने आविष्कृत केला आहे. शंकर पाटील यांच्या ' नाटक ' , 'टिपिशन ' , 'धिंड ' , ' वळीव ' यासारख्या कथात ते विक्षिप्ताचा वापरही चातुर्याने करतात.

गंगाधर गाडगीळांच्या ' खरं सांगायचे म्हणजे '( १९५४ ) , 'बसचं तिकीट ' , 'दोन चाके ' इत्यादी कथा विक्षिप्ताचे रुप धारण करणाऱ्या कोटीरुपातील कथा आहेत. बंडू - स्नेहलता या दोघांच्या ठिकाणी काही स्थिर स्वरुपाची स्वभाववैशिष्टये निर्माण करुन त्यांना नवरा - बायको या वर्गाचे प्रतिनिधित्व केले आहे. ( ' बंडू ' १९६१) मधील गाडगीळांचा विनोद विक्षिप्ताच्या स्वरुपात असला तरी मानवी मनावर प्रकाश टाकण्याचे काम करतो. त्यांचे ' फिरक्या ' ( १९७६ ) हे कोणत्याच वाङ्मय प्रकाराचे बंधन स्वतःवर लावून न घेता विमुक्त शैलीत केलेले विनोदी लेखन आहे.

लीलाधर हेगडे :- यांनी ' गुंतागुंत ' ( १९६७ ) , ' फेडाफेडी ' ( १९७१ ) या

पुस्तकातील लेखनात राजकीय उपहासाला विशिष्टाच्या पातळीवरुन व्यापक पातळीवर नेण्याचे कार्य केले आहे. राजकीय जीवनातील व्यंगे हास्यापद करून अव्यंग राजकीय जीवनाची प्रचीती देण्याचे सामर्थ्य त्यांच्या उपहासात आहे.

अशा प्रकारे विनोदाचे काही नवे आविष्कार करुन चांगल्या दर्जाच्या विनोदी वाङ्मयाची निर्मिती अलीकडच्या पंचवीस एक वर्षात विविध लेखकांनी केली आहे. १९६० नंतर विनोदी म्हटल्या जाणाऱ्या वाङ्मयाची विपुल प्रमाणात निर्मिती झालेली दिसते.

बाळ गाडगीळ, सुभाष भेंडे, बाळ सामंत इत्यादी लेखक वाङ्मयीन स्वरुपाचे विडंबनात्मक लेखन आवडीने करतात असे दिसते. तसेच विनोदाला शृंगाराची जोड देऊन रंजकता वाढविण्याचा प्रयत्न इंद्रायणी सावकार, वा. भ. पाटील, वि. आ. बुवा, वसंत मिरासदार इत्यादी लेखक करताना दिसतात.

या विनोदी वाङ्मयाविषयी प्रसिध्द समीक्षक डॉ. गो. मा. पवार म्हणतात " केवळ उथळ रंजन परतेच्या ऐवजी रंजनाच्या जोडीनेच जीवनदर्शनाचे कार्यही विनोद साधू शकतो, ही जाणीव जर वाढीला लागली तर मराठीतील विनोद आणखी संपन्न होऊ शकेल.

या विनोदी वाङ्मयाची काही निरीक्षणे नोंदवता येतील

— मिश्किलता, हजरजबाबीपणा, सूक्ष्म निरीक्षण करण्याची वृत्ती, ही या वाङ्मयाची वैशिष्ट्ये आहेत.

— उपहास, उपरोध, कोटी या तंत्राचे कलात्मक उपयोजन लेखकांनी केले आहे.

— जीवनाविषयीचा आशावाद , दृष्टीकोन, आत्मपरीक्षण करण्याची वृत्ती या लेखनातून स्पष्ट होते.

साठोत्तरी साहित्यविश्वाचा थोडक्यात आपण आढावा घेतला. आपणाला वि. शं. पारगावकर यांच्या कादंबऱ्यांचा अभ्यास करावयाचा आहे. त्यादृष्टीने स्थूलमानाने कादंबरी या वाङ्.मयप्रकाराच्या घटकांची ओळख करून घेण्याचे ठरविले आहे.

( ब ) कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार :-

कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार करताना कादंबरीचा उगम, कादंबरीची व्याख्या, कथानक, स्वभावलेखन, वातावरण, मनोविश्लेषण, भाषाशैली, संवाद इत्यादी घटक कादंबरीचे सौंदर्य वादविण्यास उपयोगी आहेत. या सर्वांचा अभ्यास कादंबरीमध्ये केला जातो.

कादंबरी हा एक प्रमुख वाङ्.मयप्रकार आहे. त्याचे 'गद्यात्मक कथा' असे वर्णन करण्यात येते. इंग्रजी साहित्याच्या अनुषंगाने ' कादंबरी' हा वाङ्.मयप्रकार मराठी साहित्यात आला. ' कादंबरी' हा वाङ्.मयप्रकार आधुनिक असला तरी त्यामधील 'कथातत्वा' ची परंपरा जुनीच आहे. कादंबरी हे नाव सन १८३० च्यापूर्वी पडलेले असावे. कारण १८२९ मध्ये प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र - भाषेच्या कोशात हा शब्द आढळतो.

१८ व्या शतकात फील्डिंगने ' टॉम जोन्स ' हे पुस्तक प्रसिध्द केले. तेंव्हापासून अर्वाचीन कादंबरीचा जन्म झाला. सूत्रबध्द कथानक , मार्मिक स्वभावरेखन आणि समाजाचे उत्तम प्रतिबिंब हीं यालेखनाची वैशिष्टये आहेत.

कादंबरीला सत्यसृष्टीचा आधार असतो. पण सत्यसृष्टीचे दर्शन घडविताना लेखकाला स्थल - काल प्रसंगादी बाबतीत योग्य ती निवड करावी लागते. ' मानवी जीवन ' ही सामुग्री व ' मानवी जीवनाचे चित्रण ' करणे हे उद्दिष्ट कादंबरीचे आहे. हेन्री जेम्सला कादंबरीची सार्थकता ' जीवनाच्या अभिव्यक्ती ' त वाटते. राल्फ फॉक्स

कादंबरीला ' मानवी जीवनाचे गद्य ' म्हणतो तर मॅक्समुलर ' जीवनाचे भाष्य ' म्हणतो.

त्याचप्रमाणे हिंदी कादंबरीकार प्रेमचंद कादंबरीला ' मानवी जीवनाचे रहस्योद्घाटन ' म्हणतो. अशारीतीने कादंबरीच्या सर्व व्याख्या पाहिल्यानंतर सर्वच टीकाकार कादंबरीला ' जीवनाचा आरसा ' म्हणून मान्यता देतात. अशारीतीने कादंबरीचा उगम पाहिल्यानंतर कादंबरीच्या व्याख्या पाहाव्या लागतात.

कादंबरीची व्याख्या :--

कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार करताना कादंबरीची व्याख्या पाहणे गरजेचे ठरते. कादंबरीची सोपी व्याख्या करण्याचा प्रयत्न **M. Abell Chevelley** या फ्रेंच लेखकाने केला आहे. ते म्हणतात " जिला काही विस्तार आहे अशी गद्य कल्पित कथा " [९] म्हणजे कादंबरी. तर ई. एम. फॉस्टर म्हणतात " पन्नास हजार शब्दांच्यावर लिहलेली कोणतीही काल्पनिक गद्य - कथा म्हणजे कादंबरी होय." [१०] या दोन व्याख्यांना विस्तृत करुन न्यू इंग्लिश डिक्शनरीकार म्हणतात " भरपूर विस्तार असलेली मानवी जीवनातील व्यक्ती व त्यांच्या कृतीचे कथानकातून दर्शन घडविणारी काल्पनिक गद्य - गोष्ट किंवा कथा " [११] म्हणजेच कादंबरी होय.

तसेच पाश्चात्य टीकाकारांनी कादंबरीची व्याख्या केली आहे. वाइल्ड - च्या मते " मानवी जीवनाशी संलग्न अशा मानवाचे त्याच्या कृती, साहस आणि भावभावना व्यक्त करणारी आणि विविध व्यक्तीसमूहाचे दर्शन घडविणारी व तिच्या

शेवटच्या रुपात जुन्या रोमान्सपेक्षा वेगळी ठरणारी अशी कल्पित गद्य कथा म्हणजे कादंबरी होय." [१२]

त्याचप्रमाणे मराठी समीक्षकांनीही कादंबरीची व्याख्या केली आहे. श्री. मा. कुलकर्णी यांच्या मते " कार्यकारण शृंखलाबध्द अशा कल्पित कथानकाच्याद्वारा मानवी जीवनाचे दर्शन घडविणारी सविस्तर ललित गद्य-कथा म्हणजे कादंबरी." [१३] तर मा. का. देशपांडे कादंबरीची व्याख्या करताना म्हणतात " कादंबरी म्हणजे जीवनाचे विस्तृत व कलात्मक गद्य - चित्र होय. " [१४]

कथानक :--

कादंबरीचे प्रमुख तत्त्व म्हणजे कथानक होय. कथा हा कादंबरीचा प्राण आहे. कथानक कादंबरीचा एक घटक आहे. त्यामध्ये 'जे जे घडले' त्याची संगतवार माहिती सांगितली जाते. कथानकामध्ये अनेक प्रसंगाची साखळी असते. कथावस्तूत नुसते कालानुक्रमाने कथन करून त्यामधील कार्यकारणभावाचा दुवा स्पष्ट वा सूचित केलेला असतो. कथानक म्हणजे विशिष्ट व्यक्तींच्या विकासामध्ये घडलेल्या प्रसंगाची चतुराईने केलेली गुंफण होय. कथानकात केवळ काय आहे? हेच ऐकण्यास आपण उत्सुक असतो.

कादंबरीचे कथानक आकर्षक करण्यासाठी कार्यकारणमीमांसा व कुतूहलनिर्मिती हे दोन गुण आवश्यक आहेत. चांगल्या कथानकांत एका प्रसंगातून दुसरा प्रसंग निर्माण होतो. कादंबरीतील कथानक म्हणजे एक किंवा अनेक पात्रांच्या जीवनातील

विवक्षित प्रसंगांची ' चतुराईची गुफण ' होय.

उदा. वि. स. खांडेकरांच्या ' दोन ध्रुव ' या कादंबरीमध्ये रमाकान्त व सुरंगा मोटारीतून जुहूच्या वाळवंटाकडे जात असता ड्रायव्हर सहजच कामापूरचा उल्लेख करतो व सुरंगाच्या डोळ्यात पाणी येते. मूळ वातावरणाशी काहीसा विसंगत असा हा उल्लेख असला तरी वाचकांच्या मनात सुरंगाचा पूर्वइतिहास काय व तिचा कामापूरशी काय संबंध असावा यासंबंधी निरनिराळ्या कल्पना मनात येतात. व पुढील प्रसंगाविषयी उत्कंठा वाढत जाते.

कादंबरीमध्ये केवळ वर्णन देऊन किंवा उत्सुकतापूर्ती करुन चालत नाही. तर उत्सुकतानिर्मिती बरोबरच वाचकाच्या मनात ' हे असं का झालं ? ' अशापेक्षा ' असं झाले असतं तर ' असे चालना देणारे प्रश्न निर्माण करण्याची शक्ती असली पाहिजे. तरच कथानक श्रेष्ठ ठरते.

उदा. ना. सी. फडके यांच्या ' सुषमा ' या कादंबरीमध्ये नितीन कुलकर्णीचा विमान - अपघातामध्ये मृत्यू होतो. या मृत्यूमुळे कथानकाला कलाटणी मिळते. व सुषमाच्या स्वभावातील सुप्त गुणधर्माचा विकास होण्यास मदत होते. घननीळ जहागिरदाराशी सुषमाची अनपेक्षितपणे भेट होते . यावेळी वाचकांची उत्कंठा वाढत जाते. या कादंबरीत अपघात किंवा अनपेक्षित भेटीमुळे कादंबरीला वेगळी वळणे

मिळतात व ती वाचकांना अधिक संभाव्य अशी वाटतात.

कादंबरीची उभारणी व तिचे यशापयश कथानकावर अवलंबून असते.

वाचकाचे लक्ष कादंबरी वाचीत असताना कथानकाकडे लागलेले असते. कथानकाचे आकर्षण काही वेगळेच असल्यामुळे अलिकडील कथानकविहरीत मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्या एकांगी व अपूर्ण वाटतात. म्हणून त्या वाचकांना आकर्षित करू शकत नाहीत.

कथानकाचे प्रमुख गुण म्हणजे मौलिकता , संभवनीयता , सुसंघटीतता , रचनाकौशल्य , रोचकता , रंजकता आहेत. या गुणामुळेच कादंबरीचे कथानक आकर्षक व वाचनीय वाटते.

कथानकाची उभारणी विविध घटनांच्या आधारावर होत असते. पण घटनांची मांडणी आकर्षक व कलात्मक रीतीने कशी करावी यावर लेखकाचे रचनाकौशल्य अवलंबून असते. प्रसंग एकानंतर एक मांडण्याने कथानक तयार होत नाही . रचनाकौशल्याकरता लेखकाला विषयानुरूप निवड करून त्यांची सहेतुक आणि कार्यकारणसंबंधानुसार मांडणी करावी लागते. प्रसंगाची उत्कटता व रोचकता वाचकाच्या मनात उत्सुकता निर्माण करण्यास मदत करते. जीवनात नेहमी सुख किंवा दुखः नसते, तसे कथानकातील प्रसंगातही ते नसावे.

कादंबरीकार हा पात्रांचा जनक असल्याने त्याला आपल्या पूर्ण पात्रांचा परिचय असतो. इतकेच नव्हे तर आपण निर्माण केलेल्या पात्रांशी तादात्म्य पावून निरनिराळ्या प्रसंगी पात्रांच्या भावना काय असतील याचा काल्पनिक अनुभवही तो घेतो. पात्रांच्या मनोभावनांचे दिग्दर्शन वाचकांना पटते. विख्यात फ्रेंच कादंबरीकार

फ्लॉबर्ट यांच्या मते " लेखकाने पात्रांच्या अन्तर्हृदयात प्रवेश मिळविला पाहिजे . पात्रांना आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न त्याने करु नये....." [२४] असे ते म्हणतात. थोडक्यात कादंबऱ्यातील पात्रे पृथगात्म असावीत तशीच समष्टीरुप मानवी जीवनाची प्रतिनिधीभूतही असावीत .

कथानकाचा प्रारंभ :- उत्कंठा , हूरहूर आणि विस्मय या त्रयीवर कथानकाचे आकर्षण अवलंबून असते. या आधारावरच लेखकाला त्याचा प्रारंभ, मध्य व शेवट करावा लागतो. कथानकाचा प्रारंभ विषयाला पोषक असा असावा, तर तो चटकदार , नाट्यपूर्ण व मनाची पकड घेणारा असावा. कथासूत्रातील एखाद्या वेधक बिंदूवर कथानकाची सुरुवात करावी लागते त्यामुळे प्रमुख पात्रांच्या मनातील खळबळ व्यक्त होण्यास वाव मिळतो. कथानकामध्ये आटोपशीरपणा , रेखीवपणा , सुटसुटीतपणा व चटकदारपणा येईल अशी कथानकाची सुरुवात करावी.

कथानकाचा मध्य :-- चटकदार व नाट्यात्मक आरंभ करुनही कादंबरीत लेखकाला वाचकाची जिज्ञासा सतत जागृत ठेवावी लागते. कथानकाचा मध्य दोन प्रकारचा असतो. १) विस्मयकारक प्रसंग, कुतूहलजनक घटना, सूचक संवाद, प्रसंगाची योजना इत्यादी . २) निरनिराळ्या प्रसंगाची योजना शिखराकडे नेणाऱ्या पायऱ्याप्रमाणे ठेवावी.

कथानकाचा शेवट :-- सर्व घटनांची व पात्रांची जुळवाजुळव शेवटच्या बिंदूवरच केली पाहिजे असे नाही तर असंदिग्ध स्वरूपातही कादंबरीचा शेवट

करता येतो.कथेतील सर्व सूत्रांना एकत्र करून कथानकाची उगीच लांबी न वाढवता, नीटनेटका व स्वाभाविक शेवट करावा.

स्वभावरेखन :-- मानवी स्वभावात परिवर्तन होते. आणि हे परिवर्तन दोन प्रकारचे असते. ते म्हणजे अपरिवर्तनशील व परिवर्तनशील अशा दोन्ही प्रकारच्या व्यक्ती आढळतात. काही व्यक्तींच्या स्वभावात परिस्थितीमुळे बदल होतो. काही कालमानाप्रमाणे व वयोमानाप्रमाणे बदलतात. वाल्या कोळ्याचा महान वाल्मीकी कवी होतो, तर एखादा सज्जन मनुष्य दरोडेखोर बनतो. कोणताच मनुष्य जन्मतः वाईट स्वभावाचा नसतो. परंतु वयोमानाप्रमाणे सभोवतालच्या परिस्थितीनुरूप त्याच्यात बदल होतो.

स्टिव्हन्सनच्या मते " पुष्कळदा कादंबरीकाराच्या काल्पनिक व्यक्ती म्हणजे परिचित व्यक्तीतच थोडा बहुत फेरबदल घडविलेले नवीन नमुने असतात. अशा वेळेस तो प्रतिभाशक्तीने परिचित व्यक्तीच्या सांगाड्यात आकृतिविशेष व गुणविशेष आणखी घालून नवीन व्यक्ती निर्माण करतो. " [२५]

त्याचप्रमाणे सत्याला धरून चालणारा युधिष्ठिर जीवनामध्ये फक्त एकदाच आणीबाणीच्या वेळी युध्दनीती म्हणून ' नरो वा कुंजरो वा ! ' असे अस्पष्ट सत्य बोलतो. तेव्हा त्याच्या मनातील स्थिर विचारांचे हे परिवर्तन आश्चर्यजनक असले तरी मानवी स्वभावाला धरूनच आहे. त्यामध्ये तर्कशुध्दता नसली तरी अवास्तवता नसते असे एक महाभारतातील उदाहरण सांगता येईल. अशारीतीने

स्वभावरेखाटनामध्ये चित्रण जिवंत , स्वाभाविक , वास्तव , औचित्यपूर्ण व सुसंगत असावे लागते.

वातावरण :-- स्थल - काल वैशिष्ट्यांचे कादंबरीमध्ये पडलेले प्रतिबिंब म्हणजे वातावरण होय. कादंबरीतील घटना कोणत्यातरी स्थळी व कोणत्या तरी काळी घडलेल्या असतात. स्थळ व काळाचे दर्शन कादंबरीतून घडविणे यालाच पार्श्वभूमी व वातावरण म्हणतात. कथानक व व्यक्तीदर्शन यांतील रहस्य उलगडण्यासाठी वातावरणाचा उपयोग होतो. चित्रकलेमध्ये पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे आहे. तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यांतील रहस्य उलगडण्यास फार उपकारक होते. कादंबरीमध्ये योग्य ते वातावरण निर्माण करण्यास जर ग्रंथकारास यश लाभले तर कथानकातील विविध प्रसंग आणि घटना यांमधील कार्यकारणभावाची संगती सहज प्रगट होऊन व्यक्तीदर्शनाचे खरे मर्मही वाचकांस सुलभ रीतीने प्रतीत होते. वातावरणाचा आपण तंत्रदृष्ट्या विचार करू लागलो की ,प्रथमच आपली दृष्टी स्थलविषयक किंवा भौगोलिक वातावरणाकडे वळते.

वातावरणाची दुसरी पातळी म्हणजे कादंबरीची ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी होय. भौगोलिक पार्श्वभूमीइतकीच ऐतिहासिक व सामाजिक पार्श्वभूमी कादंबरीकाराने निर्माण करणे आवश्यक आहे. तसेच सामाजिक कादंबरीकार एका तऱ्हेने तत्कालीन समाजाचा इतिहासकारच असतो. म्हणून दोन्ही प्रकारच्या

कादंबऱ्यात कथानककालीन सामाजिक वातावरण प्रतिबिंबित होणे जरुर आहे. उदा.- हरिभाऊंच्या ऐतिहासिक व सामाजिक कादंबऱ्यांस जी अलौकिक लोकप्रियता लाभली तिचे रहस्य योग्य ते वातावरण निर्माण करण्याच्या अव्दितीय कौशल्यातच आहे.उदा.'दुर्दैवीरंगू' ही उत्तम ऐतिहासिक वातावरण असलेली कादंबरी आहे. थोडक्यात कादंबरीकाराची कला यशस्वी होण्यास वातावरण कवच आपल्या कथानकाभोवती लेखकाने निर्मिले पाहिजे. तरच वाचकाच्या मनावर अधिक परिणाम होऊन ते जास्त आनंददायक होते.

मनोविश्लेषण :-- मानवी अंतरंगाचे भाव, भाव भावनांचे विकार, विचारांचे विश्लेषण करणे यासच मनोविश्लेषण म्हणतात. व्यक्तीचित्रण हे ज्यावेळी ढोबळ स्वरूपाचे होते त्यावेळी मानवी मनातील भाव-भावना वितारण्याचे काम लेखकाला करावे लागत नसे. तेव्हा मनोविश्लेषणाचा प्रश्न नव्हता. मनोविश्लेषणास कादंबरीच्या घटकात स्वतंत्र स्थान दिले असले तरी वास्तविक त्याचा समावेश स्वभावरेखनांतच होऊ शकतो. कारण पात्र परिपोष करतांना पात्राच्या मनःसृष्टीचे यथार्थ चित्र रंगविणे हाच महत्वाचा भाग असतो. या मानवी मनाच्या सूक्ष्म परिज्ञानावरच महाकवींची किंवा कादंबरीकाराची कीर्ती आधारलेली असते. हे खरे असूनही मनोविश्लेषण या शब्दाला पारिभाषिक अर्थ व स्वरूप प्राप्त झाले असून कादंबरीकाराने व टीकाकारांनी या अंगास बरेच महत्व दिले आहे.

मानवी मनाचे यथार्थ चित्र रंगविणे हेच आपले महत्वाचे काम समजणाऱ्या

कादंबरीकारांनी नव्या मानसशास्त्राचा फायदा घेऊन त्याच्या आधाराने पात्रांची मनःचित्रे रंगविण्याची तत्परता दाखवली व मनोभावनांचे पृथक्करण करण्यास सुरूवात केली.

उदा. - वामन मल्हारांच्या ' रागिणी ' ने लेखकांची व वाचकांची दृष्टी अंतर्मुख करून पात्रांच्या मनाच्या वाढीवर, विकासावर भर देऊन मनोविश्लेषणाच्या आगमनाची पूर्वतयारीही केलेली होती. प्रा. ना. सी. फडके, श्री. वि. स. खांडेकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर या लेखकांच्या कृतींत अनुक्रमे 'प्रवासी', 'दोन मने' 'शाप' या कादंबऱ्यांपासून मनोविश्लेषणावर विशेष भर दिलेला दिसतो. अशा प्रकारचा प्रयत्न विभावरी शिरूरकर यांची 'बळी' श्री. चिपळूणकरांची 'सुनीता' इत्यादी अलीकडे प्रसिध्द झालेल्या कादंबऱ्यांत दिसतो.

<u>भाषाशैली</u> :-- भाषाशैली व लिहिण्याची शैली असे शैलीचे दोन प्रकार समजले जातात. शैली म्हणजे रीती किंवा लिहिण्याची पध्दत. इंग्रजीत शैलीला Style म्हणतात. तर संस्कृतात रीती म्हणतात. 'रीतिः आत्मा काव्यस्य' इतके रीतीला वामन महत्व देतो.

विचार व भावना व्यक्त करण्याचे एकमेव साधन या दृष्टीने भाषेला फार महत्वा आहे. कोणत्याही कादंबरीस श्रेष्ठ दर्जा प्राप्त व्हावयाचा असेल तर तिच्या भाषासौष्ठवावर अवलंबून नसून, त्या प्रगट झालेल्या लोकचरित्राच्या यथार्थ व मार्मिक चित्रणाने होत असतो. पण वातावरण निर्माण करणे किंवा पात्रपरिपोषाचा

उठाव चांगला होणे यालाही भाषाशैली हे महत्त्वाचे साधन असल्यामुळे तिचा कादंबरीच्या घटकांमध्ये स्वतंत्रपणे समावेश केला आहे.

कादंबरी ही ललित - साहित्यांतर्गत येत असल्यामुळे व सामान्याहून सामान्य वाचक हा तिचा ग्राहक असल्यामुळे तिची भाषा ही जितकी साधी, सोपी, घरगुती व प्रासादिक असेल तितके तिचे स्वरूप रमणीय व आकर्षक होईल. कादंबरीतून निबंधाप्रमाणे केवळ विचार व्यक्त करावयाचे नसतात, तर भावनांचे वर्णन करावयाचे असते. त्याकरिता अनुरूप शब्दांची योजना करावी लागते.

उदा. - हरिभाऊंच्या यमूचे जीवन चितारणारी भावकथा तिला तिच्याच शब्दांत बोलू देणे. लहानपणीच्या गोष्टी असोत वा माजघरातील कथा असोत हरिभाऊ तिच्याच भाषेत सर्व भावना व्यक्त करतात. बाबांच्या रागीट स्वभावाचे वर्णन ती थोडक्या व भावपूर्ण शब्दांत करते. " बाबांच्या बरोबर जेवायचे म्हणजे कशी ' जेवणाची राळ ' होते , कुठे 'गुंतवळ सापडल्यावरूनच ' संतापाची कशी झोड उडते. " [१६]

वरेरकरांची भाषा साधी , सरळ व पांडित्याच्या स्पर्शाही न होऊ देणारी रोखठोक असते. तर पेंडसे ' एल्गार ' मधून त्या प्रदेशातील भाषेचे आगळे स्वरूप दाखवतात.

फडके यांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे " मनातील अर्थ व ध्वनी यांच्याशी संवादित्व राखणारी भाषा लिहिली म्हणजे शैलीची योग्यता प्राप्त होते." [१७]

भाषा ही कमवावी लागते. व तीत सहजरम्यता व साधेपणा आणणे हे कार्य वाटते तितके साधे नाही. भाषाशैलीमुळेच मराठी कादंबऱ्यांच्या इतिहासातील त्यांचे स्थान अढळ राहील असे वाटते. उदा. - ' इंदू काळे व सरला भोळे ', ' विहंगवृंद ' , 'जग हे त्रिविध आहे ' इत्यादी कादंबऱ्यांतून सामाजिक आशय आलेला दिसतो. अशा प्रकारे भिन्न प्रकारच्या कादंबऱ्यात योग्य अशी विविध प्रकारची भाषाशैली मराठी कादंबरीस लाभली आहे.

संवाद हा भाषाशैलीचाच एक भाग आहे. संवाद कादंबरीच्या विषयानुरूप असावेत. असे करताना त्यामध्ये अलंकाराचा चडेजाव किंवा शब्दांचा अवघडपणा नसावा. रागामध्ये असलेला मनुष्य ज्याप्रकारे सर्वसाधारणपणे बोलू शकेल तसेच त्याने कादंबरीत बोलावे. अन्यथा त्यामध्ये कृत्रिमता येते. उदा. ' मंजुघोषा ' या कादंबरीमध्ये असा भाग पाहावयास मिळतो. मंजुघोषाचा बाप आपल्या बायकोवर रागावला असताना तो म्हणतो " माझ्या इष्ट कन्येने नृपश्रेष्ठ कुमारास शिष्टजनही संतुष्ट होऊन ज्यास मान तुकवतील अशा विवाहांतील वरिष्ठ गांधर्वविवाह करून ती यथेष्ट सुखोपभोगानुभव घेणार , तो या दुष्टमती भ्रष्ट स्त्रीने केवळ एकनिष्ठ सापत्न व मत्सरभावाने तिजवर महारिष्ट आणावे असा हेतु धारण करूनच माझ्या मनात तिजविषयी क्लिष्ट कल्पना भरवून रुष्ट अंतकरणाने तिला नाना भोग भोगावयास लावून नष्ट दिशेस लाविले हे स्पष्ट आहे. " [१८]

थोडक्यात , कादंबरीतील संवाद हे प्रत्यक्षातील संवादासारखे तंतोतंतही

नसावेत किंवा अलंकार व बोजड शब्दांनी नटलेले कृत्रिमही नसावेत. संवाद हे पात्रानुरूप साधे, सुटसुटीत व भावपूर्ण असले म्हणजे त्यामध्ये वास्तवता येते. संवादाचा कथानकाशी संबंध येत असल्यामुळे ते कथेशी एकरूप झाले पाहिजेत. संवाद लांबलचक नसावेत ते सुटसुटीत व सोपे असावेत. संवादामध्ये आटोपशीरपणा असावा. थोडक्यात, कादंबरीचे कथानक, स्वभावरेखन, वातावरण, मनोविश्लेषण , व भाषाशैली हे प्रमुख घटक आहेत.

वरील सर्व विवेचनावरून आपणास पुढील निरीक्षणे नोंदवता येतील.

— साठोत्तरी साहित्यात नवसाहित्योत्तरी , दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, आदिवासी साहित्य , जनसाहित्य हे मुख्य प्रवाह आहेत.

— साठोत्तरी साहित्यात नवसाहित्याच्या प्रवाहाच्या दिशेने पुढे जाणाऱ्या नवसाहित्योत्तरी साहित्याची मानवी जीवनावर नियतीचा असणारा प्रभाव , समाजाचे सूक्ष्म निरीक्षण, वास्तववाद, अस्तित्ववाद या तत्वप्रणालीचे कलात्मक उपयोजन, प्रायोगिकता, संमिश्र भावानुभवाचे प्रत्ययकारी चित्रण, आशयानुरूप भाषाशैली ही वैशिष्ट्ये जाणवतात.

— दलित साहित्याने दलितांची अस्मिता जागी केली. हे साहित्य प्रस्थापित समाजमूल्यांच्या विरोधात उभे राहिले.

— डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत.

— ग्रामीण साहित्यातून ग्रामजीवनाचे प्रत्ययकारी चित्रण येते. ग्रामीण भाषांच्या

कलात्मक उपयोजनातून ग्रामसंस्कृती आविष्कृत झालेली आहे.

— आदिवासींच्या शिक्षणासाठी ग्रंथालय, प्राथमिक, माध्यमिक शाळा याद्वारा खूप प्रयत्न करण्यात आले.

— जनसाहित्याची संकल्पना द्विमुखी आहे. या संकल्पनेत सामाजिक मूल्यात्मकता आणि वाड्.मयीन मूल्यात्मकता हातात हात घालून चालतात.

— या कालखंडात कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र, ललितगद्य या वाड्.मय प्रकारात भरीव स्वरुपाचे लेखन झाले. कथा कादंबरीतील भावानुभवाचे क्षितिज विस्तीर्ण झाले. भावनुभवाची अधिक गाठी आव्हाने पेलण्याचे सामर्थ्य वृध्दिंगत झाले. नाटकात प्रायोगिकता आली. भाषांतर रुपांतरद्वारा अन्य भाषांशी अदान - प्रदान घडते. कवितेने परंपरेचा नव्याने शोध घेतला. ती अधिक चिंतनपर तशीच वास्तववादी झाली. लघुनिबंधास काव्यात्मकता, चिंतनात्मकता लाभली. तसेच लेखकाचा जीवनविषयक दृष्टीकोन, सूक्ष्म निरीक्षण, व्यासंग यांचे मनोहारी प्रतिबिंब लघुनिबंधात पडले.

जीवनाच्या क्षेत्राचा विस्तार झाल्यामुळे विविध क्षेत्रातील व्यक्तींची चरित्रे लिहिण्यात आली. तर आत्मचरित्रातून दलित, स्त्रिया, कलावंत, पत्रकार, उद्योगपती, डॉक्टर, लेखक यांचे भावानुभव प्रगट झाले. प्रवासवर्णनातून विविध देशांची संस्कृती, इतरांशी संवाद साधण्यातून निर्माण झालेले नाट्य आविष्कृत झाले. तर व्यक्तिचित्रणातून व्यक्तीचे मन व त्याची वर्तनवैशिष्ट्ये कलात्मकतेने शब्दबध्द झाली.

त्याचप्रमाणे कलावंत हा सामान्य माणूसच आहे याचे दर्शन घडले. तर विनोदी वाड्.मय मिश्किलता, हजरजबाबीपणा, जीवनाविषयी आशावादी दृष्टीकोन , आत्मपरीक्षण करण्याची वृत्ती यांत शब्दांकित झाले आहे.

कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार करताना कादंबरीची व्याख्या, कथानक, स्वभावरेखाटन, वातावरण, मनोविश्लेषण, भाषाशैली, संवाद या घटकांचा विचार करण्यात आला.

थोडक्यात, साठोत्तरी साहित्य व कादंबरीचा तंत्रदृष्टया विचार यांचा स्थूल विचार प्रस्तुत प्रकरणात करण्यात आला आहे.

## प्रकरण पहिले

### संदर्भ


१. भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना व विद्रोह,'
पुणे, १९७७, पृ. २१

२. लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड ७ वा वाई पृ. ६६०

३. तत्रैव, पृ. ६६०

४. भालचंद्र फडके, उनि, पृ. ६७

५. लक्ष्मणशास्त्री जोशी, मराठी विश्वकोश खंड १२ वा वाई पृ. १२४३

६. तत्रैव, पृ. १२३१

७. तत्रैव, पृ. १२४४

८. जान्हवी संत, कादंबरी एक वाङ्मयप्रकार, कोल्हापूर पृष्ठ १४

९. तत्रैव, पृष्ठ ८

१०. तत्रैव, पृष्ठ १०

११. तत्रैव, पृष्ठ १०

१२. तत्रैव, पृष्ठ १०, ११

१३. तत्रैव, पृष्ठ १४

१४. बापट व गोडबोले 'मराठी कादंबरी तंत्र आणि विकास,' पुणे, पृ. ९१

१५. तत्रैव, पृष्ठ १०८

१६. जान्हवी संत, उनि, पृ. ९०

१७. जान्हवी संत, उनि, पृ. ९३

१८. जान्हवी संत, उनि, पृ. ८२